डॉ. नितीन मोरे

# दोन अंक प्रेमाचे



# दोन अंक प्रेमाचे

(दोन अंकी विनोदी नाटक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# दोन अंक प्रेमाचे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# दोन अंक प्रेमाचे

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २६ मे २०२०

©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,(विनोद)
4. नाच जमूरे नाच,(विनोद)
5. अहम ब्रह्मास्मि, (विनोद)
6. मच्छर टाईम्स, (विनोद)
7. संवादोनी प्रकटावे (विनोद)
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास (पत्रे)
12. भ्रिभ्रष्टाचार! (विनोद)
13. आधुनिक कहाण्या (विनोद)
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार (नाटक)
15. राग दरबारी (एकांकिका )
16. वाळूतल्या रेघा (विनोद)
17. संधी साधू (नाटक )
18. न.बा.च्या (प्रेम) कविता (कविता)
19. व्यक्ती आणि कथा - ठेंग्यादादा.. पेद्रू.. अँड्रयू इ.
20. प्रीतीची 'प्रेम'कथा (कादंबरी)
21. ऐसा ही होता है!
22. तोच चंद्रमा..
23. काही (च्या काही) कविता
24. दोन अंक प्रेमाचे (विनोदी नाटक)

## डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांच्या लिंक्स

नाटके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sandhisaadhoo_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samvadoni_prakatave_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahh_nitin_more.pdf

इतर

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/letters_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/na_ba_kavita_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vyaktikatha_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/preetichi_premkatha_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/toch_chnadrama__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kkk_nitin_more.pdf

www.esahity.in

www.esahity.com

















राग दरबारी
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अहम् ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
वाळूतील रेषा


डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या(प्रेम)कविता


डॉ. नितीन मोरे
संधी साधू



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार



डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
संवादांनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

हे दोन अंकी नाटक

ज्येष्ठ रंगकर्मी

श्री रत्नाकर मतकरी यांस सादर अर्पण.

डॉ. नितीन मोरे

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे चौविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# दोन अंक प्रेमाचे

# अंक पहिला

## प्रवेश १

(एक कॉलेजातली टीचर्स रूम. प्राध्यापक मिलिंद मुरकुटे. एक तरूण प्राध्यापक. रूममध्ये अजून कोणीही नाही. उभे राहून स्वगत बोलायला लागतो..)

मिलिंद :

टू बी की नॉट टू बी..

च्यायला!

हा पण प्रश्न उरू नये? कमीत कमी तो प्रश्न पडलेला हॅम्लेटला.. की त्याच्या बापाच्या भुताला? की त्याच्या काकाला?  कुणालाही असो..

पण मला..?

मला नाही पडला तो प्रश्न! का?

कारण एकच.. उत्तर नॉट टू बी.. एवढे क्लियर उत्तर मिळाले असताना कशाला टू बी चा प्रश्न?

आपण आपले नॉट टू बी वर व्हावे सेटल!

मी काय म्हणतो.. नॉट टू तर नॉट टू बी! हो की नाही?

शेवटी काय कुठलाही प्रश्न असो.. त्याचे उत्तर मिळणे महत्त्वाचे!

काय आहे गणिताच्या शिक्षकाला एकच एक उत्तर मिळण्याची सवय .. दो और दो पाच .. हे त्या .. त्याच्याकडे! इथे प्राध्यापक मिलिंद मुरकुटे यांना एकच एक उत्तर हवे!

त्या मराठीतल्या मराठे बाई नाहीतर पॉलिटिकल सायन्सवाल्या त्या पांचाळाकडे दो और दो पांच भी हो शकते है.. सॉरी हो सकते हैं.. असले काही चालत नाही माझ्याकडे. इथे दोन अधिक दोन बरोबर चार.. चारच.. बरोबर!

तर मी प्राध्यापक मि. मि. मुरकुटे!

एक.. मी मुरकुटे.. मी म्हणजे मी.. इंग्रजी आय.. आणि मिलिद मधला ही मी..

आणि मारकुटे नाही. मुरकुटे! उगाच गोंधळ नको म्हणून सांगतोय..

दुसरे..

प्राध्यापक म्हटले म्हणून कुणी पोक्त विसरभोळा असेन असे वाटू देऊ नका. ऐन तिशीतला तरणाबांड आणि तेजतर्रार स्मरणशक्ती लाभलेला असा तो मी.. ते दिसतेच आहे आपल्याला.

म्हणजे तरणाबांड वगैरे..

आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर इथवर पोहोचलोय.. इथवर म्हणजे ..

या आमच्या टीचर्स रूम मध्ये!

क्लास संपला आजचा. रूम सापडली अशी मोकळी! म्हटले म्हणून टाकावे स्वगत!

नाही, तशी माझी गत त्या स्वतःशीच बोलणाऱ्या प्रोफेसर सोमणांसारखी नाही. सोमणांचे कुणी ऐकत नाही म्हणून बोलावं लागतं त्यांना स्वतःचे स्वतःशी. पण

मी स्वगत म्हणतोय ते संवाद साधावा म्हणून! स्वतःशीच!

आपुलाचि वाद आपणासी!

तर कर्तृत्व म्हणजे .. मॅथ्स पोस्ट ग्रॅड! फर्स्ट क्लास! वर हा जॉब! झाले सहा महिने. पर्मनंट! आजकाल जॉब्स मिळतात कुठे? पण मिळाला! विथ माय ग्रेड्स दे हॅड टू गिव्ह!

तर तो मिळाला.

'तो' तर मिळाला.

पण 'ती' चे काय? तो म्हणजे जॉब!

ती म्हणजे .. नोकरी? नाही. एक नोकरदार बनणार मी? नऊ ते पाच.. संध्याकाळी मग घरी.. चहाचे घोट घेत.. तिच्या हातचा..

तेच! ती? कठीण आहे!

म्हणून तर म्हटले ना.. नॉट टू बी च ठीक आपल्यासाठी!

काही खरे नाही!  म्हणजे सारे खोटे आहे का? सारे खोटे मुरकुटे? च्यायला अजब तर्कशास्त्र! खरे नाही म्हणजे खोटे? इलाॅजिकली लाॅजिकल! की लाॅजिकली इलाॅजिकल? गाॅड नोज!

गणित! इतका गहन प्रॉब्लेम .. तो सोडवायची पद्धत कोणी शिकवली नाही .. पायथॅगोरसने पण नाही.. आयुष्य म्हणजे युक्लिडची भूमिती..

आयुष्य म्हणजे प्रश्नांचा पाढा..

प्रश्न एके प्रश्न.. प्रश्न दुणे डबल प्रश्न!

आयुष्य म्हणजे..

प्रश्नांचा गुणाकार नि उत्तरांचा भागाकार!

की प्रश्नांचा लसावि आणि प्रयत्नांचा मसावि?

कोण म्हणतो असे?

कोण कशाला म्हणेल? लसावि आणि मसावि .. मीच म्हणतोय.. चिंता नसावी!

(इतक्यात मृदुला आत येते. घाईघाईत. टेबलामागच्या शेल्फवर काहीतरी शोधते. मिलिंद थबकून गप्प होत पाहात राहातो. काही बोलणार तोच एक तरूण मुलगा येऊन उभा राहतो.. )

मृदुला: यस्स .. मिळाले. चल.

(पटकन् अबाऊट टर्न करून बाहेर पडते त्या मुलाबरोबर. मिलिंद दोघांकडे बघत राहतो.. कोण असावा तो असे आश्चर्याचे भाव तोंडावर.)

मिलिंद :

कोण तो? नाही ठाऊक मला.

पण ती? ती ठाऊक आहे.

तीच आहे ती जिच्याबद्दल बोलत होतो मी.

पाहिलंत कशी तरातरा गेली निघून.

एक नजर भी नहीं डाली यारों.. सोचो क्या होगा हमारा.

आणि लक्षात आलेच असेल ..

दिल्ली फारच दूर आहे.. हुं.. दिल्ली असेल दूर पण घोडा मैदान जवळच आहे!

मृदुला! सहा महिने झाले इथे येऊन या कॉलेजात. मृदुलाला पाहून तीन महिने.

पण अजून साधे हाय पण नाही नि हॅलो पण नाही! हाय!

त्यात आज हा आलेला व्हिलन तरूण कोण? कठीण आहे मि.मुरकुटे.

नॉट टू बी हेच खरे!

(मृदुला परत आत येते. परत काहीतरी शोधतेय. तो मुलगा नाही आता हे पाहून मिलिंद पुढे जात..)

मिलिंद : काही शोधता आहात काय? माझी काही मदत?

मृदुला : हुं. शोधतेय काही. पण मला नाही वाटत तुम्ही काही करू शकाल मदत. क्लासची वेळ झाली..

मिलिंद : हो.. माझा पण क्लास आहे पुढचा. थर्ड इयर मॅथ्स..

मृदुला : माहिती आहे मला. मुलांकडून ऐकून आहे.. फेमस आहात तुम्ही ते.. कठीण गणितं सोपे करून शिकवता म्हणून..

(मिलिंद लाजल्यासारखा पाहातो.. त्याला मृदुलाची माहिती आहे.. तिचा शिकवण्याचा विषय ही ठाऊक आहे.. पण ते न दाखवत..)

मिलिंद : तुम्ही म्हणजे .. कुठला विषय?

मृदुला : इकॉनॉमिक्स! दुसरे वर्ष. पोरं टारगट आहेत..

मिलिंद : टारगट.. म्हणजे तुम्हाला टारगेट करतात की काय?

मृदुला : अय्या! किती विनोदी बोलता तुम्ही! मॅथ्स.. आम्हाला असे प्रोफेसर असते तर आम्ही कशाला इको घेतले असते?

मिलिंद : काय सांगताय काय? म्हणजे इकोचे प्रोफेसर चांगले म्हणून तुम्ही?

मृदुला : चला.. मी निघते..

मिलिंद : पण बेल नाही झाली अजून .. इट्स फॉर अस दॅट द बेल गिव्ह्स टोल्स!

मृदुला : वा! पण काय आहे ना.. कुणीतरी वाट पाहतंय तिकडे .. मग जाईन वर्गावर..

मिलिंद : ठीक.. मग बोलूच!

(मृदुला निघून जाते..)

मिलिंद : गेली. प्राणकलिका गेली. प्राणज्योत मावळली.. प्राणज्योत? च्यायला! मेलो की काय मी?

(नाडीवर हात ठेवतो. छातीचे ठोके पाहतो हाताने..)

मिलिंद : काही खरं नाही.. नाडी लागत नाही.. म्हणजे देहावसान? नो.. नाय .. नेव्हर .. तिशीपण नाही उलटली.. मुरकुट्या.. तुला जाऊन कसे चालेल? अजून तुझ्या आईसाहेबांनी सूनमुखही  नाही पाहिले.. तुझे ते गणित.. तुझे विद्यार्थी.. तू गेलास तर मग तुझ्या विद्यार्थ्यांनी कुणाच्या तोंडाकडे पाहावे? कुठल्या गणितात बसते ते? पण मग प्राणज्योत मावळली म्हणतात ती? नो..

(मग चिमटा घेऊन पाहतो )

मिलिंद : (विव्हळतो) आई आई गं..

(त्याचवेळी मृदुला आत येते.)

मृदुला : काय झालं हो?

मिलिंद : काही नाही.. तुम्ही? मावळल्या होतात ना .. परत उगवलात..

मृदुला : हे काय? उगवायला नि मावळायला मी काय सूर्य आहे की चंद्र.. पण विव्हळता कशाला?

मिलिंद : काही नाही हो.. एक मच्छर चावला..

मृदुला : (एक पुस्तक उचलत) हेच विसरलेली मी..

(मृदुला निघून जाते.)

मिलिंद : (नाट्यगीताच्या सुरात) सूर्य? नव्हे चंद्रमा!

गेली ती मन ची रमा

नाही का तिजला तमा

लागला मजला दमा

पाहुनी तव मुख चंद्रमा ..

यस्स ..

आज पहिल्यांदा उनसे मुलाकात हुई..

बात हुई .. आगे हमारा जाने क्या होगा?

आंखे दो और दो चार होगी..

येस..

कठीण नाही इट्स इझी गणित ..

टू प्लस टू इज इक्वल टू फोर!

बट इज इट दॅट इझी?

## प्रवेश २

(स्थान : कॉलेजातील एक वर्ग. शिक्षक म्हणजे मिलिंद उभा आहे. समोर एकुलती विद्यार्थीनी म्हणजे मृदुला बसली आहे. फळयावर विषय.. (हृदयाचे) गणित.. खाली आकडेमोड केलेली दिसतेय.. शेवटी लिहिलेय.. दोन अधिक दोन बरोबर किती?

मिलिंद शिकवतोय. मृदुला डोळयांच्या पापण्यांची पिटपिट करत बसलीय.. मिलिंद लिहितोय .. पुसतोय..)

मिलिंद : मुलांनो .. नाही  मुलींनो.. नाही मुली.. आज आपण एक अत्यंत कठीण गणिती संकल्पना शिकणार आहोत. लक्ष देऊन ऐक.. कारण हे गणित पुढील आयुष्यात आणि आयुष्यभर उपयोगी पडणारे गणित आहे..

मृदुला : अय्या, हृदयाचे गणित? सर, तुम्ही शिकवाल तर मी शिकायला तयार आहे..  कठीण गणित तुम्ही किती सोपे करून शिकवता सर..

मिलिंद : तू शिकशील तर मी शिकवायला तयार आहे..

मृदुला : सर.. शिकवा मला हृदयाची भूमिती..

मिलिंद : अर्थातच त्रिमिती..

मृदुला : आणि एक रेखा..

मिलिंद : रेषा.. ऐक मुली, लक्षात ठेव.. दोन बिंदूंत असतो तो .. रेषाखंड..

मृदुला : अय्या श्रीखंड? आमच्याकडे लग्नात श्रीखंडच करतात. कित्ती गोड!

मिलिंद : श्रीखंड नव्हे.. .भूखंड नव्हे.. वेखंडही नव्हे.. तर रेषाखंड! एका बिंदूपासून सुरू होऊन अनंतापर्यंत जातो तो.. एक दिशा मार्गी.. किरण!

मृदुला : किरण नाही काही .. त्याला बाण म्हणतात..

मिलिंद : बाण? हां बाण!

मृदुला : मतलब दिलको चीरकर जाता है वोह!

मिलिंद : दोन्ही कडून अनंतात जाणारी ती रेषा ..

मृदुला (उठून उभी राहते. मिलिंदसमोर हात पसरत ..) : बघा ना सर.. रेषा माझ्या हाताची. सांगा भविष्य माझे .. अवस्था सांगा हृदयाची..

मिलिंद : मुली, बस त्या बाकावर .. तुझेच नाव बरे बाणाच्या टोकावर .. जे छेदून गेले आरपार.. वेदना नकोस देऊ फार.. असे वाटते अनंत काळ शिकवीत राहिन तुला.. हे गणित ..

मृदुला : असे काय सर.. अनंत काळ जाते ती रेषा .. दोन्ही बाजूंनी .. भूमिती नको.. प्रमेय नको.. नको मला आकडेमोड..

मिलिंद : आवाज तुझा किती किती गोड.. भूमितीतील त्रिमिती आणि आणि माझ्या या हृदयाची  परिमिती .. माझ्या मनाच्या काठाकाठाने जात मोज तो मनाचा परिघ.. शोधून काठ त्याचे आकारमान.. लांबी गुणिले रूंदी गुणिले उंची.. आणि त्यात मावणारे अथांग प्रेम..

मृदुला : अय्या! ती काय टाकी आहे? त्यात किती पाणी भरेल विचारायला?

मिलिंद : मुली.. सोडव हे गणित.. उदाहरण एक.. हृदयाच्या टाकीत मनाच्या नळीने दर सेकंदात जर पाच लिटर प्रेम भरत असेल..

मृदुला : पाच लिटर प्रेम?

मिलिंद : सायलेन्स.. टांचणी पड शांतता.. मला वर्गात आवाज चालत नाही.. माझा सोडून.. तर दर सेकंदात पाच लिटर प्रेम भरत असेल तर (स्वतः कडे डोक्यापासून पायापर्यंत बोट दाखवत) पाच फूट साडेआठ इंच उंचीच्या टाकीत प्रेम भरण्यास किती सेकंद लागतील?

मृदुला : सर, सर.. कसा सोडवू हा प्रॉब्लेम .. सुटला नाही तर नका करू ब्लेम..

मिलिंद : सोपेय एकदम .. लांबी गुणिले रूंदी गुणिले उंची म्हणजे आकारमान..

मृदुला : अय्या! सर ती हृदयाची टाकी घनाकृती आहे? मला वाटले वर्तुळाकार.. दंडगोलाकार!

मिलिंद : हुशार आहेस मुली .. हुशार आहेस.. तर प्रॉब्लेम दुसरा ..

मृदुला : अय्या पहिला सुटला नाही तोच दुसरा हजर?

मिलिंद : होय .. प्रॉब्लेम ही प्रॉब्लेम .. हम सब समस्याओंसे घिरे हुए हैं.. तर उदाहरण दुसरे .. पंधरा लाख लिटर आकारमानाच्या मनाच्या टाकीची.. दंडगोलाकार टाकीची खोली किती ..

मृदुला : अय्या! मनाचा कसा थांग लागेल सर? अथांग .. पण मी सांगू? घेऊन डुबकी मनाच्या अथांग डबक्यात.. नव्हे सागरात .. जाता जाता पकडेन भाव भावनांची मासोळी आणि घेऊन येईन किनाऱ्यावर स्वतःच्या हाताने .. सर..

मिलिंद : मला वाटतेय कळला हा प्रॉब्लेम मुली तुला.. अगदी मिळेल तुला प्रावीण्य गणितात! पण माझा प्रॉब्लेम कोण कसा कधी कुठे सोडवणार .. गणिताचे सर.. सर सर झाडावर.. चढून बसलेत.. कोण सोडवून दाखवेल माझा प्रॉब्लेम?

मृदुला : अर्थातच मी! मैं हूं ना..

मिलिंद : सच्ची?

मृदुला : मुच्ची ..!

**प्रवेश ३**

(स्थळ : तीच टीचर्स रूम. मिलिंद बसला आहे. एकाएकी स्वप्नातून जागा होतो.)

मिलिंद : स्वप्न म्हणू की सत्य हे? ती.. माझी विद्यार्थीनी. मी शिकविले तिला.. गणित. अगणित वेळा! शिकविले मी तिला चालायला हृदयडोहाच्या काठाकाठाने काढत त्याचा परीघ. म्हणाली, किती सर सुंदर त्रिज्या ह्या हृदयवर्तुळाची! वा! नाहीतर सांगणार होतो मार डुबकी ह्या काळीज डोहात आणि शोधून काढ.. त्याचे आकारमान.. ती तर आताच गेली माझ्या समोरून निघून तिच्या वर्गावर. मग ही कोण होती? ही तीच होती.. स्वप्न की सत्य? काढून पाहतो चिमटा स्वतःच स्वतःला..

(स्वतःलाच चिमटा काढतो.. विव्हळतो..)

मिलिंद : आई आई गं..

(हे म्हणत असतानाच मराठे मॅडम आणि पांचाळसर आत शिरतात..)

मराठे : काय झाले मुरकुटे सर? आईची आठवण आली अचानक?

पांचाळ : अहो, स्वप्न पाहिले असणार .. दिवास्वप्न.

मराठे : नाही, मुरकुट्यांच्या गणितात स्वप्नाला वाव नाही.

पांचाळ : खरंय.. गणित म्हणजे बाप दाखवून श्राद्ध करा.

मराठे : काहीतरीच पांचाळ सर.. बाप दाखवला तर श्राद्ध कशाला करायला हवे? बाप सलामत तर श्राद्ध कशाला?

पांचाळ : खरेच की..

मराठे : बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर असे आहे ते..

मिलिंद : अहो श्राद्ध नाही.. मच्छर चावला हो.. आजकाल डासांचा पण काही भरवसा उरला नाही, नाही का?

मराठे : हो ना! अहो काय तर वेगळे वेगळे स्पेशल मच्छर निघालेत म्हणे! मलेरियाचा वेगळा नि डेंग्यूचा वेगळा. कायतरी बाई. स्पेशालिस्ट डाॅक्टरसारखा स्पेशालिस्ट मच्छर! तुम्हाला कुठला चावला? मलेरिया की डेंग्यू?

मिलिंद : नाही माहिती हो.. भेटला की विचारून सांगेन .. त्याची स्पेशालिटी..

मराठे : नक्की विचारा हां..

मिलिंद : विचारेन.. अगदी मुलाखतच घेऊन टाकेन टीव्हीवरच्या सारखी ..

पांचाळ : मुरकुटे, प्रिन्सिपॉल बोलावताहेत..

मिलिंद : मला? का?

पांचाळ : तुम्हालाच नाही. सगळ्या स्टाफला. ते कायतरी ॲन्युअल डे च्या प्रोग्राम बद्दल आहे..

मराठे : म्हणजे मराठी सेक्शन माझ्याकडे येणार! तीन कविता तयार आहेत माझ्या. छापून टाकेन मॅगझिन मध्ये. तुम्ही लिहिता की नाही मुरकुटे कविता?

पांचाळ : नाही हो. गणिताचे टीचर ते.. बे एके बे वाले. त्यांना कवितेची भाषा काय कळणार?

मिलिंद : खरंय ते.. आणि कविता करत नाहीत .. आपोआप होते म्हणतात ना?

मराठे : वा! म्हणजे आपोआप कविता होण्याची वाट पाहतात? पहा.

पांचाळ : हे वयच आहे त्यांचे.. मुरकुटे कुठे जमवलं की नाही?

मिलिंद : काय हे पांचाळसर.. उगाच माझ्यासारख्या गरीबाची चेष्टा. आणि ते कल्चरल प्रोग्राम वगैरे माझ्यासाठी कठीण आहे..

पांचाळ : बघा बुवा. मिस भडभडे असतील त्याच्या इन चार्ज..

मराठे : कोण? भडभडे? आताच तर आली ती. कानामागून आली नि तिखट झाली..

मिलिंद : तिखट? कोण?

मराठे : हो ना. आली आता नि लगेच कल्चरल मध्ये.

पांचाळ : अहो मराठे मॅडम, ती स्टेजवरची अनुभवी आहे. तिला डायरेक्ट एन्ट्री.

मराठे : हुं. इथे आम्ही इतकी वर्षे घालवली आणि ही कालची पोर.. इकॉनॉमिक्स शिकवते ना ती..?

पांचाळ : हो ना.

मिलिंद : मिस भडभडे म्हणजे?

मराठे : मिस भडभडे कोण माहिती नाही? काय हे.. तुम्ही हनुमानाचे भक्त का हो? ब्रह्मचारी.. आज शनिवारच आहे.. तेल वाहायला आणि रूईचा हार घालायला विसरू नका हां मुरकुटे .. मिस भडभडे ठाऊक नाही? तीन महिने झाले तिला येऊन.

मिलिंद : मिस भडभडे म्हणजे त्या इकॉनॉमिक्सच्या नवीन आलेल्या मृदुला मॅडम?

मराठे : आता कसे? लक्ष सगळीकडे.. बगळयासारखे! बकध्यानी.. मृदुला मॅडम म्हणे!

पांचाळ : अहो.. बकध्यानी कधी मासोळी पकडतील कळणार ही नाही!

मिलिंद : काहीतरीच तुमचे पांचाळ सर. पण कल्चरल कमिटीची मिटिंग कधी आहे? नाही म्हणजे प्रिन्सिपल साहेबांचा आदेश असेल तर ..

मराठे : तुम्ही नका चिंता करू.. आम्ही सांभाळून घेऊ. उगाच तुमच्या मनाविरूद्ध नको..

मिलिंद : नाही हो तसे काही. सर म्हणतात तर बघतो बापडा प्रयत्न करून.. प्रयत्ने वाळूचे तेल रगडिता कण ही गळे म्हणतात!

मराठे : कोण? तुमच्या मराठीत असतील. आम्ही मात्र वाळूचे कण रगडून तेल गाळतो! तुमच्याकडे काही उलटेसुलटे असेल तर..

पांचाळ : होतं हो असे.. समजून घ्या. भडभडे बाईंचे नाव काढले की असं होणं साहजिक आहे..

मिलिंद (मनात.. हळूच..) : भडभडे.. बाई? इतक्या सुंदर तरुणीस बाई म्हणणे म्हणजे अपमान तिचा..

(प्रकाश फक्त मिलिंद वर..)

मिलिंद :मऊ मुलायम

मृदुल ती मृदुला..

चंचल चतुर चपलचरण

ती चपला ..

उद्यानी ती सुंदर कलिका

का म्हणतो तिजला फूल?

चांडाळ पांचाळा

तू एक नंबरचा फूल!

परि अस्मानीची
या भूमीवर
आली उतरून
या धरतीवर
एक नजर तिची जर पडली
होईल दांडी तुझीच गुल
चांडाळ पांचाळा
तू एक नंबरचा फूल!

कुणी म्हणावे कुणास बाई
तुज का काहीच वाटत नाही ..
म्हण खुशाल तिजला काहीबाही
आहेच ती तुमची ताई..
आली ती माझ्याच दिलावर
खुशाल करण्या रूल
चांडाळ पांचाळा
तू एक नंबरचा फूल!

**प्रवेश ४**

(टीचर्स रूम. तीच. मिलिंद घाईघाईत येतो. समोर मराठे मॅडम आहेत. काहीतरी कामात डोके घालून बसलेल्या. मिलिंदच्या खुर्चीचा आवाज येताच वर मान करून बघतात.)

मराठे : काय मग मुरकुटे .. झाली का मीटिंग?

मिलिंद : कसली मॅडम?

मराठे : तीच. प्रिन्सिपल सरांबरोबरची?

मिलिंद : ती? झाली की. तुम्ही आला नाहीत मॅडम?

मराठे : नाही. ती कालची भडभड्यांची पोर डोक्यावर चढून बसणार असेल तर.. भडभडून येणारच. आम्ही इतकी वर्षे काढली, एका शब्दाने सरांनी नाही विचारले. आणि तुम्ही .. नव्या नवेलीबरोबर चालले लगेच हुरळून!

मिलिंद : मी निघू मॅडम, क्लास आहे माझा ..

(मिलिंद बाहेर निघून जातो. बाई थोडे इकडेतिकडे बघतात नि पर्स उचलून निघून जातात. मराठे बाई जाताच मिलिंद परत आत शिरतो..)

मिलिंद : गेली वाटते ती मराठीण .. मिस भडभडेवर जळून जळून खाक कोळसा झाली असणार .. कोण ऐकणार हिची बडबड.. बसून शांतपणे विचार करावा .. मृदुला मला

खरेच नाटकात घेईल? भारतमुनींचे नाट्यशास्त्र नाहीतर नाट्यशास्त्रातील उद्बोधक उदाहरणे.. असे काही लायब्ररीतून इश्यू करतो आज. वाचेन किंवा न वाचेन. पण तिच्यावर इंप्रेशन तर पडेल की नाही? एखाद्या मुलीवर इंप्रेशन पाडण्याची ही पद्धत असेल का? इंप्रेशन पाडण्याच्या दहा सुलभ युक्त्या .. असे काही पुस्तक असेल तर ते पण घेऊन येतो.. आताच.. काही नाही तर आयडिया तरी इंप्रेसिव्ह आहे..

(उठून उभा राहतो जाण्यासाठी. मृदुलाला भेटलेला तो तरूण मुलगा आत शिरतो..)

मुलगा : मृदु कुठे आहे हो? आली का?

मिलिंद : कोण मृदु?

मुलगा : मृदु म्हणजे मृदुला .. प्रोफेसर मृदुला भडभडे..

मिलिंद : ओह! नाही आल्यात अजून. काही काम होतं का?

मुलगा : नाही .. म्हणजे हो..

मिलिंद : निरोप बिरोप असेल तर..

मुलगा : नाही. थांबतो मी वाट पाहात ..

मिलिंद : नको.. नको.. अहो त्यांचा पिरियड शेवटचा असेल तर एक वाजताही येतील.. आमच्या इथे फ्लेक्सिबल टायमिंग आहे..

मुलगा : चालेल. मृदुसाठी थांबेन मी. कितीही वेळ.

मिलिंद : तरी निरोप काही असेल तर.. म्हणजे तुम्हाला भेटली नाही ती.. आय मीन भेटल्या नाहीत त्या तर..

मुलगा : काही नाही, सांगा मी येऊन गेलो.

मिलिंद : कोण आले होते म्हणून सांगू ..?

मुलगा : मी येऊन गेलो म्हणून सांगा.

मिलिंद : ठीक सांगतो.. मी येऊन गेलो ते.

मुलगा : तुम्ही नव्हे, मी येऊन गेलो..

मिलिंद : तेच तर म्हणालो मी.. मी येऊन गेलो!

मुलगा : तुम्ही नाही हो.. मी!

मिलिंद : अहो.. आपल्याकडे प्रत्येक माणसाला नाव ठेवायची पद्धत असते .. ऐकून असालच तुम्ही .. तसे नावबिव..

मुलगा : ओह! सॉरी हां. मला नावं ठेवायची सवय नाही ना कुणाला..

मिलिंद : कुणाला नाही .. स्वतःला..

मुलगा: ओ.के. टू कट लाँग स्टोरी शाॅर्ट.. चैतन्य .. चैतू.. आलाय नि खाली वाट बघतोय म्हणून सांगा. तसा मी फोन करतोय तिला. पण मूदुची सवय आहे ती. फोन सायलेंटवर ठेवते ती.

मिलिंद : मी सांगेन ना तिला .. त्यांना. तुम्ही जा. बिनधास्त.

चैतन्य : सांगा हं. विसरू नका..

(चैतन्य जातो.)

मिलिंद : हुं.. चैतन्य! मृदु म्हणे! काल मी मीटिंग मध्ये पाहिले. ती फक्त माझ्याकडे पाहात होती.. दोनदा तर मला मिलिंद म्हणाली ती.. गणिती सर इतके नाटकात रमणारे असतील असे वाटत नाही म्हणाली ती.. आज डिटेल चर्चा होणार आमची.. पटकन लायब्ररीतून नाट्यशास्त्र इश्यू करून येऊ? येस.. जातोच.. मी नाट्यशास्त्राचा अभ्यास करतोय.. पाहून  मृदुला काय म्हणेल ..

(मृदुला आत येते.)

मृदुला : सर कुठे निघालात?

मिलिंद : लायब्ररीत ..

मृदुला : काय हे सर.. इतका अभ्यास .. तुम्ही ना ग्रेट आहात..

मिलिंद : कसचं कसचं.. (हळूच..) हे स्वप्न की सत्य?.. (चिमटा काढतो स्वतःला.. विव्हळतो..) आई गं..

मृदुला : काय झाले? सर असा स्वतःला चिमटा काढताय .. मच्छर तर नाही इथे कुठे .. तुम्हाला अशी सवय आहे का हो स्व चिमट्याची?

मिलिंद : हो, हो ना.. ना.. नाही ना.. तुम्ही? तुम्ही कधी आलात?

मृदुला : ही काय आताच.. आणि सर तुम्ही कुणाशी बोलत होतात.. नाहीतर..

मिलिंद : नाही हो.. कालपासून नाटकाचा विषय शिरलाय डोक्यात. त्याच विचारात होतो.. त्यामुळे सत्य की नाटक हे जरा गोंधळलो..

मृदुला : काय हे सर! पण हे उच्च दर्जाच्या कलाकाराचे लक्षण आहे मिलिंद .. सर.

मिलिंद : हो का? असेल. आणि एक संदेश होता ..

मृदुला : कुणाचा?

मिलिंद : चैतन्य म्हणून कुणी वाट पाहात थांबलाय म्हणून ..

मृदुला : हो का? त्याला ना कितीही सांगितले तरी राहवत नाही त्याला. आज संध्याकाळी भेटणार होतो तर आज सकाळीच आला तो.. चैतू म्हणजे चैतू आहे. ही वोन्ट इम्प्रूव्ह..

(तिच्या फोनवर ) चैतू.. बोल. अरे नक्की.. हो.. साडे सहा.. दहा नाही रे सहा.. सहा.. हो.. साडे सिक्स. नेहमीच्या ठिकाणी.. देते तुला.. बाय.. सी यू डियर ..

मिलिंद : चैतन्य .. भेटला ना? तोच आला होता..

मृदुला : हो ना.. भेटेल संध्याकाळी.. तर नाटकाचे काय?

मिलिंद : बघूया .. माझा क्लास आहे ना. तो झाला की..

मृदुला : मी निघते हां.. सर. दुपारी बसून ठरवूयात..

मिलिंद : ठीक..

(मृदुला जाते.)

मिलिंद : म्हटले ना.. आपल्या नशिबी नॉट टू बी.. डियर चैतन्य .. हुं.. नाटक करू की नको? मृदुला आधीपासूनच.. हुक्ड आणि बुक्ड .. चैतन्य .. मला अचैतन्य .. अचेतन करून गेलाय .. पण नाही .. हिंमत नहीं हारेंगे हम.. जोवर भडभडे मिस आहे तोवर.. डोन्ट मिस द चान्स .. मिस यू डियर!

(प्रकाश मिलिंद वर फक्त..)

मिलिंद :

मिस भडभडे
ऐका ना गडे
ऐका ना गडे..

चालला कुणीकडे
हा सवाल गडे
मिस भडभडे..

असेल तो तरणा
तर आम्ही ना सुकडे
ऐका ना गडे

नका जाऊ तीकडे

करून हार्टाचे तुकडे

हार्टाचे तुकडे..

नको जाऊ तोडून

माझ्या दिलाचे कडे

ऐका ना गडे

मिस भडभडे

मिस भडभडे..

(पांचाळसर आत येतात.)

पांचाळ : काय मग.. मुरकुटे.. नाटकाची तयारी जोरदार?

मिलिंद : छे हो! अजून कुठे काय नक्की झालेय? तयारी कसली नि काय! पण मी वाचतोय आता.. भरतमुनींचे नाट्यशास्त्र! माझा विश्वास आहे.. नाट्यतंत्र शिकल्यावाचून नाटक करणे म्हणजे..

पांचाळ : म्हणजे पाण्यात पोहावे कसे हेही तुम्ही पुस्तक वाचून शिकाल?

मिलिंद :(नाटकी ढंगात) करा.. आम्हा ध्येयवेड्यांची नालस्ती ही दुनिया करेल ही पण आम्ही बधणार नाही .. नाट्यवेडापासून तसूभरही ढळणार नाही. पण हे तुम्हाला कळणार नाही.. नाटक एके नाटक.. आणि नाटक दुणे नाटक ..

पांचाळ : वा! पाढा नाटकाचा! पण काल परवापर्यंत तर तुम्हाला नाटकाचे होते वावडे.. मग आली भडभडे..

मिलिंद : (नाटकीपणे) असेल किंवा नसेल .. पण आता नाटक हा माझा श्वास आहे.. नाटक माझा भास आहे.. नाटक माझा आस आहे.. नाटक माझा आभास आहे.. नाटक हा माझा .. नाटक हा माझा ..

पांचाळ : डास आहे म्हटले तर चालेल का? नाही शब्द जुळतोय म्हणून म्हटले ..

मुरकुटे : चालेल .. माझी मराठी कवतुके.. अमृतातेही पैजा जिंके..

(मराठे मॅडम आत येतात.)

मराठे : काय हो मुरकुटे .. क्लास आहे म्हणून गेलात नि इकडेच? आणि असा मराठीचा नाद कधी पासून लागला?

पांचाळ : नाद! करेक्ट शब्द! कसला नका विचारू.. कोणाचा ते विचारा!

(मिलिंद लाजतो.)

पांचाळ : बघा बघा ते आरक्त गाल..

मराठे : हुं.. ती करेल बघा कसे यांचे हाल..

पांचाळ : कां बरे मॅडम चुकचुकते पाल..?

मराठे : मी कशाला सांगू .. दिसतेच तशी ती पांढरी पाल..

पांचाळ : असे म्हणता? मुरकुटे .. उभे रहा घेऊन ढाल..

मराठे : ढाल.. नाही ढालगज! नाम नव्हे विशेषण ..

(प्रकाश मिलिंदवर..)

मिलिंद :

पाहतोय मी.. ह्या डोळ्यांनी..

प्यार करनेवालोंसे जलती है दुनिया ..

उसे ना शर्म न हया ..

पांढरी पाल म्हणे..

आपल्या हेव्याने जळून खाक होऊन कोळश्यासम काळयाठिक्कर झालेल्या वर्णापुढे माझी नितळ वर्णा शुभ्रातिशुभ्रा मृदू मुलायम मृदुला ..

माझी? नाही अजून ..

त्या खलनायकाचा.. चैतन्याचा पाडाव करून त्याच्या छाताडावर विजयी वीरासारखा राहिन उभा नि जिंकून घेईन मनकर्णिकेस.. नि अचेतन करीन त्या चैतन्यास तर नावाचा मिलिंद मुरकुटे ..

कारण माझ्याकडे आहे कठीण गणित सोडवण्याची सोपी पद्धत..

असे तीच म्हणते..

होय! मीच मिलिंद .. मीच मुरकुटे ..

वापरेन मी पायथॅगोरसचे प्रमेय नाहीतर न्यूटनचे नियम..

काहीच नाहीतर आईन्स्टाईनची थियरी..

नाहीतर नाट्यशास्त्रातील सिद्धांत ..

नाहीतर मराठीतील अलंकार ..

अलंकार ..

यस.. त्या अलंकारांनी मढवीन मी मृदुला राणीला ..

नखशिखान्त ..

शिखा.. म्हणजे शेंडी

पण शेंडी आहे का तिला?

असेल किंवा नसेल..

पण शेंडी तुटो की पारंबी..

मिस भडभडे.. हॅज टू बी मिसेस मुरकुटे ..

लॅटर ऑर सूनर ..

यस्स .. सून ऑफ मुरकुटेस् ..

मृदुले.. तुझ्या मृदुल कमलचरणांनी.. नाही चरणकमलांनी ये..

हंसगामिनि.. गजगामिनी.. ये..

चालत चालत

ये तुझ्या मुलायम हातांनी ..

नाही हातांवर चालत नाही..

ये तुझ्या मुलायम हातांनी.. घेऊन वरमाला..

आतुर आहे मी इथे..

येतेस ना..?

चिंतातुरली युवर्स ..

मि.मि.मुरकुटे ..

**प्रवेश ५**

(स्थान : कॉलेजचा वर्ग.

मिलिंद आणि त्याचा मित्र दोघे आहेत. बसून गप्पा मारताहेत..)

मुकुंद : किती दिवसांनी भेटतोयस यार..

मिलिंद : तूच साल्या बिझी. मी काय मध्येमध्ये क्लास घेतो.. तू बँकेत .. पै चोवीस तास!

मुकुंद : चोवीस तास नाही.. पण पैशांचे काम म्हणजे टेन्शन हे खरे.. पण मला वाटले तू क्लासवर असशील तर भेटतोस की नाही .. पण बरा भेटलास.

मिलिंद : यस्स .. आता एक तास फ्री.. अर्ध्या तासाने मीटिंग आहे.. म्हणून म्हटले क्लासरूम मध्ये बसून गप्पा मारू.

मुकुंद : म्हणजे कँटीनचे बिल नको भरायला.. आज ओळखतो तुला?

मिलिंद : तुला पैसे देतो डियर बँकर.. पण धिस इज अवर बंकर.. इथे नो वन विल डिस्टर्ब अस.. शीतल कशीय?

मुकुंद : छान आहे.. पुढच्या महिन्यात तारीख आहे..

मिलिंद : अरे लग्नाला बोलावले नाहीस.. डायरेक्ट बारश्याची तयारी ..?

मुकुंद : गप रे येडचॅप. तुझे गणित तसे कच्चेच.. लग्नाची तारीख .. तेच सांगायला आलोय तुला.

मिलिंद : येतोय मी.. चार दिवस राहिन.. तूपरोटी खाईन.. जाडजूड होईन.. मगच जाईन. लिंद-कुंद जोडी अशी फेमस आपली.. असा सोडतो काय.. फक्त ॲन्युअल डे ला क्लॅशिंग नाही ना..

मुकुंद : ॲन्युअल डे? तू काय करतोयस त्यात?

मिलिंद : नाटक! लीड रोल यार!

मुकुंद : तू आणि नाटक आणि लीड रोल? इतक्या वर्षांच्या ओळखीतून सांगतो.. दाल में कुछ काला है.. कोण आहे ती? सांग.. तू अदरवाईज जायचा नाहीस नाटकबिटकात.. स्टेजला घाबरणारा तू.. डायरेक्ट लीड रोल? सांग ना कोण आहे ती जिच्यासाठी करतोयस तू..

मिलिंद : कोण नाही रे.. मी साधे नाटकात काम ही करू नये? काय मित्र मिळालेत एक एक..

मुकुंद : उगाच वेड पांघरून डोन्ट गो टू पेडगाव .. मी तुला आज ओळखतो की काय? हू इज द मोटी .. व्हेशन?

मिलिंद : मोटी? नाही रे. ती सुंदर, नाजूक, गुलाबपुष्पी.. कोकीळकंठी .. कमलनयना.. गजगामिनी.. चतुर संभाषिणी..

मुकुंद : वाटलेच मला! नाहीतर तू कसला स्टेजवर चढतोयस? मला तर वाटते तू फक्त लग्नाला .. स्वतःच्या .. चढशील स्टेजवर तेवढाच. पण आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले दिसतेय.. कोण आहे ती?

मिलिंद : तुला सांगू .. तीनच महिने झाले तिला इथे येऊन. माझी तर बोलती बंद रे.. आता काहीच दिवस झाले तिच्याशी बोलून. तीच आहे नाटकाची होल अँड सोल. मी हीरो.. ती हिराॅईन ..

मुकुंद : कुठले ट्रॅजेडी वगैरे तर नाही ना करत? भरवसा नाही तुझा .. तेरे प्यार में पागल.. दे दूंगा जान भी म्हणत शेवटी देशील जीव.. नाटकात रे..

मिलिंद : गधड्या शुभ बोल. काका किशाचा करतोय.. मी किशा ती लिली लवंगे!

मुकुंद : नशीब.. मला वाटले ती मिस टोणगावकर करतेय की काय!

मिलिंद : तो रोल मराठे मॅडम साठी .. फिट एकदम. जलती है वह मिस मृदुला पर!

मुकुंद : ओह! सो शी इज मृदुला! छान! आमच्या कॉलेजात पण होती एक.. सॉलिड फेमस..

मिलिंद : मग तुझा नंबर नाही लागला?

मुकुंद : नो यार.. तब तक मेरे जीवन में शीतल नाम की शीतल लहर आ चुकी थी. पण मृदुला वाॅज गुड.. काय तिचे नाव.. यस मृदुला भडभडे. इको ला होती..

मिलिंद : कोण? मृदुला भडभडे.. इकॉनॉमिक्स? अरे तीच तर नाही .. ही पण इको शिकवते.. दुनिया गोल भी है और छोटी भी..

(मृदुला घाईघाईत वर्गात डोकावते..)

मृदुला : मुरकुटे सर.. तुम्ही इथे आहात.. मी सारे कॉलेज शोधून आले. म्हटले आज आलाच नाहीत की काय? तुमच्या शिवाय पहिले रिडिंग कसले होतेय.. तुम्हाला पाहून किती बरे वाटले सांगू .. आयॅम रिलिव्हड अँड हॅपी.. येताय ना..

(एकाएकी लक्ष मुकुंदाकडे जाते..)

मृदुला : ओह! तू.. हाय! किती दिवसांनी दिसतोयस.. मुरकुटे सर इज युवर फ्रेंड अ‍ॅज वेल?

मुकुंद : येस्स .. जानी दोस्त .. अंडरवेअर फ्रेंड्स! लंगोटी यार नाही .. लंगोट कोण घालते आजकाल?

मिलिंद : काहीपण बोलतोस तू मुकुंदा. मिस मृदुला आम्ही अगदी शाळेपासूनचे फ्रेंड्स. ह्याला ओळखता तुम्ही?

मृदुला : ऑफकोर्स डियर. मी इको ला होते.. ही वाॅज इन कॉमर्स.. आय थिंक. हुशार होता हा.. टॉप टेन! आणि कॉलेज ऑर्केस्ट्रात गायचा मस्त.. तसबीर तेरी दिल में.. आय स्टिल रिमेंबर..

मुकुंद : ओह! तुला आठवते अजून? पण हा माझा मित्र आहे ना.. व्हेरी स्टेज कॉन्शस हां..

मिलिंद : तू काहीतरी सांगू नकोस .. मी येतोच आहे पहिल्या रिडिंगला.. ह्याला घालवून येतो..

मृदुला : अरे, मुरकुटे सर कॅन डू एनिथींग. ही इज सो सिन्सियर. ही इज पॉप्युलर अ‍ॅज वेल.. आय अ‍ॅम इंप्रेस्ड.. अँड नाइस टू सी यू.. मी निघते. सर, या हां वेळेवर ..

(मृदुला निघून जाते..)

मिलिंद : पाहिलंस कशी आहे ही? आणि तिच्या समोर स्टेज फ्राईटबद्दल बोलतोस.. अक्कल कमी आहे तुला?

मुकुंद : अरे आम्ही सत्याचे पाईक. बोलेन तर खरे.  नाहीतर काहीच बोलणार नाही! पण छान आहे ही पोरगी ..

मिलिंद : उगाच नाही .. आणि शी स्पीक्स सो मच गुड अबाऊट मी.. मला वाटते ऑल लाईन्स आर क्लियर ..

मुकुंद : हुं

मिलिंद : नुसता हुं..?

मुकुंद : हुं..

मिलिंद : कुछ तो बोलो यार..

मुकुंद : बोलू? जाग जाओ यार.. अरे कॉलेजात असल्यापासून ती अशीच आहे. समोरच्याशी ती अशी बोलते ना की त्याला वाटेल शी इज लट्टू ऑन हिम. कॉलेजात कमीतकमी दहा लोकांना वाटले होते तुला वाटले तसे. बट शी इज लाईक दॅट. तिचा स्वभावच तसा.. बट शी इज जेन्युईन इन हर टॉक.. पण त्याचा वेगळा अर्थ नको काढूस. फसशील. आमचे ते दहा ही दोस्त असेच राहिले..

मिलिंद : असेच म्हणजे?

मुकुंद : सदाफटिंग! चूक तिची नाही .. त्यांची आहे..

मिलिंद : तू टेन्शन देतोयस यार..

मुकुंद : टेन्शन नाही. वस्तुस्थिती! तुला माहितीय पोरींना फटाकडी नाहीतर बॉम्ब म्हणतात कॉलेजात .. तर हिला फुलबाजी म्हणायचे सगळे. फटाके फोडणाऱ्या सगळयांच्या हातात असते फुलबाजी तशी ही. सगळीकडे फटाके फोडून नामानिराळी.. फुलबाजीला

तरीही काही फटाकडी म्हणत नाहीत .. मृदुला इज गुड.. पण इंपॉसिबल टू गेट! सो बी रियॅलिस्टिक..

मिलिंद : आता तर मी नाटक सोडून देतो यार.. ज्या गावाचे तिकीट मिळणारच नाही त्या तिकिटांच्या लायनीत कशाला उभा राहू? आणि तिला भेटायला येतो एक कोणी.. त्याच्याशी मारत असते गप्पा .. डियर चैतू म्हणे!

मुकुंद : देअर यू आर! बोलता बोलता ती तुलापण म्हणालेली.. डियर! ती सर्वांशीच बोलते अशी.. सो.. डोन्ट फिल्टर हँड अँड लेग्स.. आय मीन हातपाय गाळून बसू नकोस.. अजून लढाई बाकी आहे.. तुम लडो हम पीछेसे चियर्स करते हैं.. किशा आणि त्याची लिली लवंगे.. बेस्ट लक यार! नाटकासाठी आणि तुझ्या ऑपरेशन मृदुला मोहिमेसाठीही! बघ काही जमतेय का! आणि काही मदत लागली तर बंदा हाजिर है!

मिलिंद : कशाला? हे सांगायला? स्टेज फ्राईट.. वगैरे वगैरे ..

मुकुंद : अरे सत्यमेव जयते! शेवटी विजय सत्याचाच होतो.. हैल युवर स्टेज फ्राईट! अँड बेस्ट ऑफ लक! आणि आमच्या लग्नाला यायचं हं..

मिलिंद : अर्थात .. बचेंगे तो जरूर आएंगे!

मुकुंद : आणि फॉर अ स्टार्ट .. तुला मदत म्हणून आय विल इन्व्हाईट मिस मृदुला भडभडे ॲज वेल.. डोन्ट मिस द चान्स! एक शादी पर दुसरी फ्री..

**प्रवेश ६**

(टीचर्स रूम. पांचाळसर, मराठे मॅडम आणि मिलिंद बसले आहेत.)

मराठे : काय मुरकुटे, कुठवर आले नाटक? नाही म्हणजे नाटकाचेच नाटक तर नाही ना झाले?

मिलिंद : हे काय मॅडम .. तुम्हाला रोल देणार त्यात आणि तुम्ही नाटकाचे नाटक म्हणता?

मराठे : मी? मी नाही बाई असल्या भानगडी करत बसत.. आपली मुलं बरी नि शिकवणे बरे.. उगाच गावभर उंडारायला नाही जमत मला.. तिच्यासारखे..

पांचाळ : खरंय मॅडम.. मुरकुटे, तुम्ही कसला करताय रोल?

मिलिंद : ठरतेय अजून ..

(मृदुला आत येते. येता येता 'बाय चैतन्य' म्हणते फोनवर..)

मृदुला : अरे वा! गुड मॉर्निंग. वा! मराठे मॅडम आहेत इथे. सकाळी भेटलात.. छान झाले.

पांचाळ : गुड मॉर्निंग ..

मिलिंद : मॉर्निंग मिस मृदुला ..

मृदुला : तुमच्याकडे थोडं काम होतं मॅडम..

मराठे : नाटकाचे असेल तर बोलू नका ..

मृदुला : तेवढेच नाही हो. कालच तुमची स्टुडंट भेटली ती सांगत होती.. तुमच्या पुस्तकाबद्दल. एकटी.. कथासंग्रह आहे ना हो?

मराठे : हुं.

मृदुला : काय आहे ना कुणी साहित्यिक किंवा खरेतर साहित्यिका अशी पहिलीच पाहतेय मी आयुष्यात. काय भारी वाटते सांगू.. म्हणजे अशी एखाद्या साहित्यिकेच्या शेजारी बसलेय मी.. जस्ट कान्ट इमॅजिन.. तुमच्या कविता असतीलच ना या वर्षीच्या मॅगझिनमध्ये..

मराठे : तुम्हाला एकटी बद्दल कुणी सांगितले? म्हणजे झाले ते प्रकाशित होऊन तीन एक महिने ..

मृदुला : तुमचीच स्टुडंट सांगत होती. मला द्या ना एक कॉपी. आणि कॉम्प्लिमेंटरी नको.. आय वुड बाय इट.. पेपरात समीक्षा आलेली मध्ये .. ती वाचलेली, पण त्या तुम्हीच हे मात्र तेव्हा लक्षात आले नव्हते. आय ॲम सो एक्सायटेड यू नो..

मराठे : हो ना. आपल्या कॉलेजात मी एकटीच जिचे असे साहित्य प्रकाशित झालेय.. पण कॉलेजला आहे का कौतुक?

पांचाळ : म्हणून तुम्ही पुस्तकाचे नाव एकटी ठेवलेय का मॅडम?

मृदुला : नाही हो पांचाळसर.. मॅडम कसल्या एकट्या.. मला तर प्रिन्सिपल सर म्हणाले, टेक मॅडम मराठेज् हेल्प .. तुमचा अनुभव मोठा..

मराठे : सर म्हणाले असे?

मृदुला : अर्थात. मराठीवर तुमचे चांगलेच प्रभुत्व आहे ना.. तुमची मदत तर हवीच. कॉलेज मॅगेझिनचे तर ठीक पा.. नाटकाचे तुम्ही नाही म्हणताय तर..

मराठे : नाही हो.. तसे नाही. आता सरच म्हणाले असतील तर बघते.

मृदुला : वा! तुम्ही आलात तर छानच होईल. कुणी सीनियर तेही तुमच्या सारखी असेल तर..

मराठे : तुम्ही म्हणता तर बघते बाई प्रयत्न करून .. काका किशाचा बसवताय ना? ऐकून आहे मी.

मृदुला : हो ना.. तुम्ही असलात तर छान होईल.. मिलिंद सर, मराठे बाईंना स्क्रिप्टची एक कॉपी देता का तुमच्याकडची. मी देते दुसरी तुम्हाला .. नंतर.

मिलिंद : देतो मॅडम ..

मृदुला : मी जरा निघते हां मॅडम. तुम्ही आहात म्हणजे आता चिंता नाही. कुणी सीनियर असले ना गायडन्सला की बरे. त्यात तुम्ही मराठीच्या प्राध्यापक .. म्हणजे कुठे अडले काही अर्थ वगैरे तर मदत होईल. आजचा दिवस असा मस्त सुरू झालाय तुमच्यामुळे. मी निघते हां जरा. मुरकुटे सर, तुम्ही मॅडमना जरा वाचन नि रिहर्सलच्याबद्दल सांगा ..

(मृदुला उठून बाहेर जाते.)

मिलिंद : तुम्हाला मी कॉपी देतो मॅडम. उद्या दुपारी भेटूया..

मराठे : चालेल. आता आग्रहच आहे सगळ्यांचा तर..

पांचाळ : पण तुम्ही बऱ्या पाघळल्या मॅडम .. नाही पांढरी पाल.. चुकचुकते म्हणून विचारतोय.

मराठे : नाही हो. ही भडभडे तशी चांगली आहे. आता या वयात थोडा उच्छृंखलपणा असायचा पण मनाने चांगली वाटते. आणि या तरूणांना आपण नाही तर कोण करणार मार्गदर्शन? हो की नाही मुरकुटे?

मिलिंद : हो ना मॅडम!

(तासाची बेल वाजते. मॅडम आणि पांचाळसर निघून जातात .. मिलिंद फोन लावतो ..)

मिलिंद : मुकुंदा.. हाय!

नाही ते काही नाही ..

तिचे काय..?

ती बिझी आहे..

नो.. नो चान्स यार..

इट्स अ टफ प्रपोझिशन..

नाही, मी मैदान सोडले नाही अजून.. पण..

पण ऐक, युवर ऑब्झर्वेशन इज ग्रेट, तू म्हणालास ते खरेय यार.. तिला मराठे मॅडममध्येही चांगले गुण दिसले यार! आणि शी इज सो कन्व्हिन्सिंग. म्हणजे तोंडदेखले बोलते असे नाही वाटत.. अमेझिंग..

इन मोअर दॅन वन सेन्स ..

च्यायला तिला सगळेच चांगले वाटतात ..

नाऊ व्हॉट?

आय नो.. बट.. आय विल ट्राय ..

डिफिकल्ट जॉब.. असेल माझा हॅरी.. तर देईल खॅटलॅवरी..

नो.. अँड ॲम नॉट इन अ हरी!

(मृदुला आत येते ..)

मिलिंद : चल.. बाय. आय विल कॉल यू लॅटर. (मृदुलाकडे वळून) मुकुंद .. त्यादिवशी भेटलेला ना .. तो..

मृदुला : हो.. त्याची आमंत्रण पत्रिका देऊन गेला तो. पुढच्या महिन्यात आहे लग्न त्याचे. आपण जाऊया..

मिलिंद : यस्स. ही इज माय बडी. शाळेपासूनचा.

मृदुला : गुड.

मिलिंद : मृदुला यू आर ग्रेट. त्या खडूस मराठे मॅडमना कसे पटवले?

मृदुला : नो.. नो. पटवले वगैरे नाही. आय कान्ट एव्हर डू दॅट. पण मला काय वाटते ना.. शी मे बी अ बीट खडूस ॲज यू से.. पण प्रत्येक जण कसा परफेक्ट असणार? इच वन हॅज लिमिटेशन्स. आपण चांगले गुण पाहिले की लाईफ बिकम्स सो मच मोअर इझियर! उगाच एकेकाचे निगेटिव्ह्स बघण्यात वेळ नाही वाया घालवू. दॅट्स माय वे ऑफ

मेकिंग डिफिकल्ट थिंग्स इझी.. तेच .. तुमचीच पद्धत. कठीण गणिताचे सोपे उत्तर सर.. मॅडम हॅज ॲग्रीड.. आता शी वुड गाईड अस ॲज वेल.

मिलिंद : मुकुंद म्हणाला ते खरेच होते तर..

मृदुला : काय?

मिलिंद : काही नाही .. तो आणि तुम्ही एकाच कॉलेजात होतात.. ही वा ॅज इन युवर ऑ.. म्हणाला मला तो.. मृदुला इज लाइक धिस ओन्ली ..

मृदुला : लाईक धिस म्हणजे?

मिलिंद : गुड टू एव्हरीवन.. लाईक धिस.. सो लाईक्ड बाय ऑल.. हियर ॲज वेल.. इन्क्ल्युडिंग मी.. अस.. इन कॉलेज.

मृदुला : नाऊ आयॅम एम्बॅरस्ड..

मिलिंद : नाही .. आय मीन इट.. मृदुला.

मृदुला : (विषय बदलत) त्या नाटकाचे स्क्रिप्ट दिले का मॅडमना?

मिलिंद : देतो.. मॅडम लगेच गेल्या निघून. उद्या डिटेल्स मध्ये वाचन करू. यू विल डायरेक्ट ..

मृदुला : येस.. तुम्ही किशा .. मी लिली .. मॅडम मिस टोणगावकर.. आमच्या स्टुडंट्स मथले पाच सहा जण आहेत.. बाकी पात्रांसाठी.. वुई विल शा ॅर्ट लिस्ट सून..

मिलिंद : यस्स .. तुला .. तुम्हाला सांगतो हे माझे पहिलेच नाटक. कधीच मी नाटकात काम नाही केले याआधी..

मृदुला : डोन्ट वरी. देअर इज ऑलवेज अ फर्स्ट टाईम! यू विल डू वेल! ॲम शुअर!

मिलिंद : थँक्स! कमीतकमी फॉर युवर सेक.. मेहनत करावीच लागेल ..

मृदुला : कराल तुम्ही मिलिंद.. सर!

(मिलिंदवर प्रकाश.)

मिलिंद :

तुझ्यासाठी करेन सारे..
तोडेन अकलेचे तारे ..
नाही नाही..
तोडून आणीन आकाशीचे तारे
बघत राहतील मग ते सारे ..

तू असशील तर
आफ्रिकेतही वाहतील थंडगार वारे..
तू असताना जिकडेतिकडे
एकच एक नारे..

मृदू मृदुल मृदुला
तुजसाठी करेन सारे..

तोडून आणिन चंद्र चांदण्या

आकाशीचे तारे..

मृदुला : कुठे लक्ष आहे मिलिंद सर.. क्लासची बेल झाली..

मिलिंद : झाली? बेल झाली म्हणजे जायची वेल.. नव्हे वेळ झाली.. चला निघूया..

मृदुला : माझा ऑफ पिरियड आहे सर. मी बसते इथेच .. तुमच्या हातातले ते पुस्तक पाहू?

(मिलिंदच्या हातात दोन पुस्तके .. एक हाऊ टू इंप्रेस पीपल .. आणि दुसरे नाट्यशास्त्र .. चुकून पहिले पुस्तक तिच्या हाती देतो.. एकाएकी गोंधळ लक्षात येऊन दुसरे पुस्तक तिला देतो..)

मृदुला : वा! भरतमुनींचे नाट्यशास्त्र! अगदी बेसिक पासून अभ्यास सुरू करता हां तुम्ही. आयॅम रियली इंप्रेस्ड..

मिलिंद : थॅंक्स..

मृदुला : बाय द वे.. एक प्रश्न विचारू?

मिलिंद : बाय ऑल मीन्स ..

मृदुला : त्या हाऊ टू इम्प्रेस पीपल मध्ये तर नाही ना लिहिलेले हे..?

मिलिंद : नाऊ आयॅम एम्बॅरस्ड, ती एक गंमत आहे.. जस्ट इन शाॅर्ट.. एक मित्र आहे माझा .. सोयीसाठी क्ष म्हणू..

मृदुला : अर्थातच .. मॅथ्समध्ये असे म्हणावेच लागते ..

मिलिंद : तर क्ष ला एक मुलगी आवडते.. य म्हणू तिला. त्याच्याच कॉलेजात आहे ती..

मृदुला : मग? इट्स इझी.. सरळ सांगायचं जाऊन ..

मिलिंद : छे हो.. तो पडला शामळू.. म्हणाला, पहिले हे पुस्तक वाचतो नि मग बघतो हाऊ टू इंप्रेस हर!

मृदुला : काही म्हणा हां मिलिंद सर.. आयॅम इम्प्रेस्ड बाय दिस आयडिया!

मिलिंद : डोन्ट टेल मी, तुला .. तुम्हाला आवडली ही आयडिया?

मृदुला : काय आहे ना, प्रयत्न करत राहणे महत्त्वाचे. केव्हा न जेव्हा यश मिळेलच!

मिलिंद : तोवर उशीर न झाला म्हणजे मिळवली!

मृदुला : म्हणजे काय?

मिलिंद : काही नाही .. असंच. म्हणजे य दुसरीकडे कुठे .. जाऊ देत.. तो बघून घेईल. मी निघू?

मृदुला : हो ना.. क्लास आहे तुमचा. त्या क्ष ला बेस्ट ऑफ लक सांगा हा माझा ..

मिलिंद : तुम्हाला ठाऊक आहे का हो असा शॉर्ट कट.. जो मी त्याला सांगू शकेन? म्हणजे समजा तुम्हीच ती य आहात.. तर एखाद्या क्ष ने काय करावे की य इंप्रेस होईल ..

मृदुला : सांगू? ते त्या त्या य वर अवलंबून आहे! अशी एकच एक आयडिया नाही काम करत.. डिपेन्डस ऑन अँड डिफर्स फ्रॉम य टू य..

मिलिंद : ओह! म्हणजे त्याला प्रथम य चा अभ्यास करावा लागेल ..

मृदुला : (नाट्यशास्त्राकडे हात दाखवत) तुम्ही कसा करता ना तसा..!

# अंक दुसरा

## प्रवेश १

(स्थान : कॉलेजचा कट्टा

मिलिंद आणि मुकुंद बसले आहेत.)

मुकुंद : मग कुठवर आली लव्हस्टोरी?

मिलिंद : आता फक्त वाजवा रे वाजवा बाकी आहे!

मुकुंद : वा! प्यार की गाडी फास्ट ट्रॅक पर! आयॅम इंप्रेस्ड! छान. आता तुमच्या सुखी संसारासाठी नवीन वस्तू घ्यायला आमच्या बँकेत या.. तुमची आमची सर्वांची बँक 'द घोटाळा प्रूफ को ऑपरेटिव्ह बँक..' जे हवे ते हस्त्याने मिळेल!

मिलिंद : हस्त्याने म्हणजे? एक आठवड्यानंतर?

मुकुंद : हप्ता म्हणजे इझी इन्स्टालमेंट.. आसान किश्तोंपर!

मिलिंद : काश ऐसा होता!(रडवेल्या आवाजात) प्यार की गाडी कसली! त्या लव्हस्टोरीच्या गाडीच्या एका चाकाचीही प्रगती नाही अजून. म्हणून तर ही इमर्जन्सी मिटिंग बोलावलीय मी..

मुकुंद : उगी उगी हां बाळा. आपण आणूया हां तुला एक गर्लफ्रेंड. ती मग माज्या बाळाशी लग्न लग्न करेल. अशी हैना माळ घालेल गळयात.. तुला हवी ना माळ? मग आमचा बाळ कशा हसेल खुदकन..

मिलिंद : तुला बोलावले तेच चुकले माझे.

मुकुंद : ओ.के. सॉरी. बोल कुठवर आली तुझी गोष्ट. वत्सा .. मी करतो चिकित्सा .. सांग तुझी कथा आणि तुझ्या मनची व्यथा. हा नव संसारी गृहस्थ तुला मार्गदर्शन करेल ..

मिलिंद: ऐक.. बघ ना.. नाटक झाले अख्खे करून..

एवढया तालमी झाल्या.. तिचे नि माझे प्रेम संवाद झाले.. नाटकातले.. किती वेळा रात्री उशीर झाला.. तिला बाईकवरून घरी सोडले.. अगदी नाटकात किशा नि लिली लवंगेचे लग्न ठरले..

मुकुंद : ठरले.. झाले.. त्यांच्या घरी पाळणा हलला असेल आतापर्यंत..

मिलिंद : पण इकडे प्रगती शून्य.. नाही म्हणायला आम्ही एकेरीवर आलो.. ती मला नि मी तिला नावाने हाक मारू लागलो.. पण

मुकुंद : छान प्रगती ..

मिलिंद : मग आम्ही तुझ्या लग्नाला येऊन गेलो.. एकत्र. ती आजही छान बोलते माझ्याशी. मी ही.. पण पुढे काही नाही .. ती कशाला दाद लागू देत नाही यार. काही बोलावे तर विषय बदलते. रागावते असे ही नाही .. नुसताच चेंज ऑफ सब्जेक्ट!

मुकुंद : काही बोलावे म्हणजे? तू काही नव्हे काहीही बोलत असशील!

मिलिंद : ते सोड.. एकूण प्रगती शून्य. भोपळा!

मुकुंद : मग आता?

मिलिंद : एकदा तिला आडून आडून विचारले मी..

मुकुंद : तू? आय डोन्ट बिलिव्ह इट..

मिलिंद : यस.. म्हटले की समज तू य आहेस..

मुकुंद : मी आणि य? तू च आहेस का? मी कशाला मधे मधे?

मिलिंद : तू नव्हे रे.. मृदु य आहे..

मुकुंद : वा! मृदु! फारच मृदु संबोधन. आणि शी इज सपोझ्ड टू बी य? तुझं डोकं फिरलंय? तुझ्या बीजगणिताने तुझ्या ह्या भूमितीतील वर्तुळाकार डोक्यात असली काही बीजं पेरली असतील ना तर कठीण आहे!

मिलिंद : ऐक ना.. तर तिला म्हटले मी, समजा ती य असेल तर क्ष नावाच्या एका मुलाने तिला इम्प्रेस करायला काय केले पाहिजे?

मुकुंद : वा! कसला जबरी प्रेम संवाद! आडून आडून.. आयॅम इंप्रेस्ड! क्ष प्रपोझेस टू य!

मिलिंद : तर ती म्हणाली ते एका एका य वर अवलंबून आहे! थोडक्यात शी गेव्ह नो हिंट यार!

मुकुंद : थोडक्यात तुझ्या ट्रिकचा क्ष य झाला! मग पुढे?

मिलिंद : तुम्ही या विषयातले अनुभवी गडी. नुकताच तुमच्या लव्हस्टोरीचा सुखांत जाहला. चारी दिशांहून माणसं लोटली. आणि डोईवर अक्षता पडल्या. तेव्हा तुमचे मार्गदर्शन मिळेल याकरता तुम्हाला दोन कप चहा आणि जमल्यास एक प्लेट पंजाबी समोसा इतकी बिदागी देऊन इथे बोलावून घेतले. तर बोल.. यापुढे काय?

मुकुंद : तिने दिलीय हिंट राजा..

मिलिंद : हिंट?

मुकुंद : अर्थात. स्टडी द य!

मिलिंद : मीन्स?

मुकुंद : तिचा अभ्यास कर.. सी व्हॉट इट टेक्स टू इंप्रेस हर!

मिलिंद : ओह! ओके! असे काहीतरी ती बोलली होती यार. डिपेंड्स अपॉन य म्हणाली ती.. राईट!

पण अजून एक टेन्शन नवे..

मुकुंद : तू काय टेन्शनचे आगार आहेस?

मिलिंद : अरे, एक चैतन्य येतो भेटायला तिला. ती त्याला चैतू म्हणते.. प्रेमाने .. नेहमीच्या ठिकाणी भेटू असे सांगत असते फोनवर..

मुकुंद : म्हणजे नाऊ आय गेट इट..  एक गोष्ट क्लियर कर.. तू म्हणालास तो चैतन्य .. त्याची माहिती काढ. इफ शी इज ऑलरेडी गाॅन.. उगाच आपली मेहनत पाण्यात..

मिलिंद : शुभ बोल नाऱ्या तर म्हणे .. पण तू म्हणतोस त्यात तथ्य आहे यार.. एकदा ते चैतन्य प्रकरण काय ते कळले की पुढचा विचार!

मुकुंद : ठीक! ते माझ्यावर सोड.. लवकरच तुला मी अपडेट देतो! मग पुढे काय करायचे ते पाहू. काय आहे आपण उगाच तुझ्या य चा अभ्यास करायचा नि परीक्षेत ती पोर्शनमध्येच नसेल तर सगळाच अभ्यास केरात.. हो की नाही?

मिलिंद : हुशार आहेस हो बाळ.. चैतन्याच्या मागावर जा.. म्हणजे तुला आध्यात्मिक ज्ञानप्राप्ती होईल.. त्या दिव्यदृष्टीने दिवे लावून सांग.. पुढे काय ते!

मुकुंद : सांगतो ना.. आता आम्हाला काही कामधाम नाही ना! एक चहा नि समोश्याच्या रोजगार हमी योजनेवर घ्या राबवून ..

मिलिंद : तू म्हणशील तसे! मी तुला दोन कप चहा देणार होतो रे! आता एकावर भागेल तर बरेच आहे!तुम्ही बँकवाले म्हणता ना तसे.. आजची बचत ही उद्याची मिळकत!

मुकुंद : छान! टाक तो एक कप चहा आमच्या बँकेत! एक कप चहावर किती इंटरेस्ट मिळेल .. मग तू धनाढ्य होशील.. मग माझी आठवण ठेवशील ना रे?

(मृदुला येते ..)

मृदुला : तुम्ही दोघे इथे?

मिलिंद : असंच .. मुकुंदचे काम होते .. चार समजुतीच्या गोष्टी सांगत होतो.. शीतलनी मुद्दाम पाठवले माझ्याकडे!

मृदुला : हो का? म्हणजे चांगलीच डेस्परेट सिच्युएशन दिसतेय.. मुकुंदा!

मुकुंद : हुं.. अडला हरी.. धरतोय पाय!

मृदुला : चला मी निघते.. मुकुंदा गायडन्स इज अ गिव्ह अँड टेक! मिलिंदला मदत लागली तर कर म्हणजे झाले.. पण मिलिंद सर इज ॲन एक्स्पर्ट इन सॉल्व्हिंग ऑल काईंड्स ऑफ प्रॉब्लेम्स.. इस्पेशियली कठीण वन्स.. सो ही मे नॉट नीड.. चलो बाय!

(मृदुला जाते.)

मुकुंद : ही काय रे अशी कोड्यात बोलून गेली?

मिलिंद : पण आहे ना हुशार?

मुकुंद : ते खरंय..

मिलिंद : थ्यांक्यू हां..

मुकुंद : तू कशाला थँक्यू?

मिलिंद : दॅट्स वन अँड द सेम यार!

मुकुंद : वा! काय कॉन्फिडन्स आहे..! तोंड बघा!

प्रवेश २

(स्थळ : टीचर्स रूम.)

पांचाळ : काय मुरकुटे सर.. कसं काय चाललंय .. नाटक मस्त झाले.. पहिल्यांदाच काम केल्यासारखे नाही वाटले.

मराठे : अहो.. हीरो आहेत ते.. हीरोचे काम हीरो सारखेच करणार .. वर लिली लवंगे मिळत असेल तर.. मन लावूनच काम करणार की नाही .. काय म्हणतात ती.. नॅचरल ॲक्टिंग..

पांचाळ : काहीतरीच मॅडम .. त्याला ॲक्टिंग तरी कसे म्हणणार?

मिलिंद : तुम्ही सकाळी माझी ताणायची हे ठरवूनच आलात की काय? पण मॅडम मला आवडला तुमचा रोल.. काय तो टोणगावकरी ठसका.. वा!

मराठे : थँक्यू मुरकुटे. खूप वर्षे झाली हो. कॉलेजात असताना केलेले नाटक शेवटचे. मग सुटले ते सुटलेच. मृदुला म्हणाली म्हणून केले. बरे वाटले .. जुने दिवस आठवले..

पांचाळ : जुने दिवस म्हणजे?

मराठे : अहो, मि. मराठे आमचे डायरेक्टर होते .. दोन वर्षे ..

पांचाळ : कळले .. मग बरोबर आहे.. आठवणारच जुने दिवस! आपणही काळानुसार त्यावेळची गंमत विसरत जातो मॅडम..

मिलिंद : थोडक्यात नाटक वा ॅज अ रिज्युविनेटिंग एक्सरसाईझ ..

मराठे : मराठीत बोलला असता तर ऑब्जेक्शन घेतले असते.. रिज्युविनेट होण्याइतके बुजुर्ग नाही झालो आम्ही.. हो की नाही पांचाळसर?

पांचाळ : अर्थात .. मी तर रोज गुडघ्यांना तेल चोळताना त्यांना बजावून सांगतो.. अभी तो मैं जवान हूं.. मग काय बिशाद त्यांची दिवसभर कुरकुरायची?

मराठे : हो ना!

मिलिंद : काय हे मॅडम .. तुम्ही असे म्हणता.. तुम्ही तर सहज कॉलेजात स्टुडंट म्हणून खपून जाल..

मराठे : काहीतरी तुमचे.. मृदुला बरोबर राहून गुण लागलेला दिसतोय पांचाळसर..

पांचाळ : हो.. मांजर डोळे मिटून दूध पिते.. तिला वाटते कुणी बघत नाही ..

मराठे : चूक सर.. बोका दूध पितोय.. मांजर नाही!

मिलिंद : मला वाटते मला जावे लागेल इकडून ..

(मृदुला आत येते ..)

मृदुला : गुड मॉर्निंग एव्हरीवन.

पांचाळ : शंभर वर्षे आयुष्य आहे तुम्हाला. तुमचीच आठवण काढत होते .. मुरकुटे सर.. हो की नाही मॅडम?

मिलिंद : हो तर.. नाटकाच्या गप्पा सुरू होत्या .. मॅडमनी रोल छान केला ना मृदुला मॅडम?

मृदुला : अर्थात! मॅगझिन वाचले की नाही मिलिंद सर? आणि मराठे मॅडम तुमचे पुस्तक मिळाले नाही अजून ..

मराठे : देईन लवकरच तुला. परीक्षेची तयारी सुरू. प्रिलीम्स येतील लवकरच.

पांचाळ : मी निघतो. क्लास आहे..

मराठे : थांबा.. मी पण निघतेच आहे..

(दोघे निघून जातात.)

मृदुला : मग काय.. मुकुंदचे काम झाले की नाही?

मिलिंद : कसले काम?

मृदुला : कालच संध्याकाळी भेटलो तेव्हा ..

मिलिंद : ओह.. ते? होतेय .. होईल ..

मृदुला : मिलिंद..

मिलिंद : काय?

मृदुला : काही नाही ..

(प्रकाश फक्त मिलिंद वर..)

मिलिंद :

काही नाही?

हेच माझे सर्व काही!

नाही काही, काही नाही

तू अशीच बोलत रहा

बोलत बोलत जवळी रहा..

जोवर वाजत नाहीत सहा..

छे! हे काही खरं नाही पहा!

प्रेम बनवते कुणाला कवी..

पण मुळात काव्याची समज तर त्याला हवी!

नको गडे ते पद्य बिद्य

कुणी काही म्हणा..

मला तर परवडेल फक्त गद्य

नाहीतर जुळतील नुसते शब्दाला शब्दाचे डबे

पण बनेल का त्यातून

भाव भावनांची सुसाट आगगाडी..?

किती कठीण गडे घातलेस गणित..

कुठल्या पद्धतीने सुटेल?

प्रश्न पडलाय या गणितज्ञाला

म्हणजे बघ किती कठीण आहे ते..

तुला ठाऊक आहे ते सोडवायची पद्धत ..?

कठीण असो किंवा सोपीशी साधी?

**प्रवेश ३**

(स्थळ: कॉलेज कट्टा.)

मिलिंद : आ गए.. क्या सोचकर आए की मैं खुस होगा .. साबाशी देगा? बोल क्या खबर लाए हो?

मुकुंद : खबर? वो खबर ही क्या जो तुम्हें बेखबर ना करे!

मिलिंद : बेखबर करके हमें यूं न जाईए.. भाऊ पाया पडतो .. पण सांग, सांगून टाक काय जे सापडले तुझ्या तपासात. कोण आहे तो.. जो माझ्या भवितव्याच्या आड येऊ पाहात आहे. कोण आहे ज्याच्या हाती आहे माझ्या पाळण्याची.. छे! भविष्याची दोरी!

मुकुंद : मला ना गंमत सुचलीय.. ज्याच्या हाती तुझ्या भविष्याची दोरी तो..

मिलिंद : तोच तू निष्ठूर, कठोर आणि अजून काय काय.. आठवतंय शाळेत असताना चिंचेच्या झाडावर चढलेला तू.. चिंचा फेकता फेकता स्वतःच खाली पडलास .. तेव्हा खाली पडणाऱ्या चिंचा सोडून तुला पकडलेले मी.. कैऱ्या तोडायचास तू.. पण दात आंबायचे माझे .. शाळेबाहेरच्या म्हातारी कडून चिक्की खाता यावी म्हणून दिलेले तुला ते दोन रूपये.. पैशांचे सोड.. पण बागेतील पेरू चोरून तू आणायचास.. पण त्यांना लावायचे मीठ.. मी आणायचो.. त्या खाल्ल्या मिठाला जाग रे.. तुला या अवेळी अशी अघोरी गंमत सुचतेय?

मुकुंद : शांत.. खाल्ल्या मिठास जागलाय तुझा हा उपकाराच्या ओझ्याखाली दबून गेलेला दोस्त.. चैतन्यची इत्यंभूत म्हणजे तुला हवी तितकी माहिती आणलीय मी!

मिलिंद : मग ती सांगायची सोडून उगाच इकडतिकडच्या गप्पा मारतोयस? बोल..

मुकुंद : यस्स. टू टेल यू द स्टोरी इन ब्रीफ .. चैतन्य इज अ गुड बाॅय!

मिलिंद : मग?

मुकुंद : तो दहावी पर्यंत आपल्या गावी होता. नाऊ ही इज नो मोअर ..

मिलिंद : क्काय?

मुकुंद : वाक्य पूर्ण करू दे यार.. नो मोअर देअर

मिलिंद : म्हणजे?

मुकुंद : म्हणजे नॉट इन हिज गाव! कसा असणार?

मिलिंद : म्हणजे?

मुकुंद : सिंपल! तो आता इकडे आहे ना!

मिलिंद : पुढे?

मुकुंद : आता तो इकडे आहे पण त्याला गावी जायचेय परत..

मिलिंद : मग? तिकिट काढून देऊ?

मुकुंद : एक नाही, दोन तिकिटे काढावी लागतील ..

मिलिंद : म्हणजे? मृदू ..

मुकुंद : सगळे ऐकल्याशिवाय असा निष्कर्षाप्रति येऊ नकोस वस्त .. नाही वत्स .. तर चैतन्यच्या बुटाची साईझ आठ नंबर आहे आणि तो रेबॅन चा गाॅगल वापरतो.. त्याला बाईक चालवायला आवडत नाही. त्याची एक सवय म्हणजे तो खार खातो.. म्हणजे लोणच्याचा खार खातो.. कैरीची फोड त्याला आवडत नाही .. लिंबाची आवडते.. गोड लोणच्यातली पण..

मिलिंद : मुक्या साल्या .. आता मुद्यावर ये नाहीतर मी गुद्यावर येईन ..

मुकुंद : अरे मिळाली ती सारी महत्त्वाची माहिती सांगून टाकतो .. तर त्याच्या शर्टाची साईझ..

मिलिंद : चूप. मोकळे रान मिळाले तर काहीही सांगतोयस.. मुद्याचे बोल.

मुकुंद : अरे नाही. याहून जास्त माहिती नाही मिळाली, म्हणजे पँटची साईझ, त्याला मेथीची भाजी आवडते की शेपूची वगैरे लवकरच हाती येईल ..

मिलिंद : हे सगळे गोळा करत फिरतोयस इतके दिवस?

मुकुंद : अर्थात.. इट टेक्स टाईम.. पण तूर्तास एक साधा मुद्दा सांगायचा राहिला .. ही इज चैतन्य भडभडे..

मिलिंद : मेलो! ऑलरेडी मॅरिड ..

मुकुंद : हवे तर तसे समज .. चैतन्य .. मे बी मॅरिड. तशी माहिती नाही पक्की.. पण हवी तर ती ही अशी डिटेल्स मध्ये काढून देईन..

मिलिंद : चूप. कामाचे बोल..

मुकुंद : तर मि. मि.मि.मु.. मिस भडभडे मिस आहेत हे मिस करू नका म्हणजे..

मिलिंद : च्यायला! हे डोक्यात नाही आले माझ्या .. सो ही इज..

मुकुंद : यस.. हर चुलत ब्रदर. डुईंग इकॉनॉमिक्स.. तो गावाहून आलाय की नाही ते नाहीत माहिती पण युवर मृदुला गिव्हस हिम नोट्स. दोघे अगदी सख्ख्या भावाबहिणीसारखे आहेत.. म्हणजे भांडतात ही..

मिलिंद : वा! काय बातमी आणलीयस! जुन्या जमान्यातला राजा असतो तर गळयातली माळ दिली असती.. नाहीतर खरंतर जहागीर दिली असती.. सरदारकी तर कुठे नाही गेली.. पण जमाना नवा आहे ना.. आता काहीच नाही तर चहा पाजतो .. एक चमचा जास्त साखर टाकून .. कर तोंड गोड!

मुकुंद : जान की बाजी लगाकर इतनी माहिती काढी मैंने.. त्याच्या बदल्यात चहाचे गोड पाणी? कोई बात नहीं.. पण चांगली बातमीय ना?

मिलिंद : चांगली? अरे भुकेल्याला अन्न नि तहानलेल्यास पाणी मिळावे किंवा घामेजलेल्यास वारा मिळावा तशी ही बातमी .. माझ्यात एक नवीन ऊर्जा आणि ऊर्मी आलीय..

मुकुंद : कळले .. नवीन कुठलीतरी ऊ आलीय इतके कळले.. एक नाहीतर दोन.. ऊवा.

मिलिंद : चैतूभय्या म्हणायला काय जात होते मृदू ला? उगाच आपली मेहनत वाया गेली..

मुकुंद : आपली? तू काय केलेस? फक्त ऑर्डर देण्याची मेहनत?

मिलिंद : तसं नाही रे.. आता पुढचे काम तुझ्याकडे द्यायचे.. ते आधीच दिले असते.. वेळ गेला ना माझा?

मुकुंद : तुझा वेळ? अरे वा! आणि पुढचे काम? अरे, हम अब शादीशुदा हैं. इन फजूल की चिजों के लिए वक्त नहीं है हमारे पास. नहीं तो हमारी नयी बेगम हमसे नाराज हो जाएगी..

मिलिंद : तेच.. नाराज व्हायला तुझ्याकडे बेगम तरी आहे.. नि इकडे आम्ही हॅव नॉट्स.. हा हॅव्स आणि हॅव नॉट्सचा संघर्ष युगानुयुगाचा.. त्यात तू साथ नाही देणार? फजूल की

चीजें म्हणे.. हिंदी सिनेमातून उर्दू शिकलायस.. तर विसरलास ते शाळेतले दिवस .. तो मॅटिनीला पाहिलेला दोस्ती..

मुकुंद : नाही .. नाही विसरलो. थोडक्यात त्या चिमूटभर मिठाला आयुष्यभर जागावे लागेलसे दिसते. त्या नादान वयात हे माहिती असते तर बिन मिठाचे नसते खाल्ले पेरू?

मिलिंद : आणि कैऱ्या..

मुकुंद : आता पुढे बोल..

मिलिंद : अब आया ऊंट पहाड के नीचे! तर आता शोध घे.. व्हॉट प्लीझेस मिस मृदुला भडभडे..

मुकुंद : हे आणि मी शोधणार?

मिलिंद : अर्थातच. अशी लढाई अर्ध्यावर सोडणे शोभते का तुझ्या सारख्या वीरास?

मुकुंद : लढाई आणि माझी?

मिलिंद : अर्थातच! आठव ते पेरूला लावलेले मीठ..

(मृदुला येते. तिची नजर जाता जाता दोघांवर पडते..)

मृदुला : अरे, तुम्ही दोघे? परत या वेळी कट्ट्यावर?

मिलिंद : हाय! गुड इव्हिनिंग. या मुकुंदाचे थोडे काम होते माझ्याकडे म्हणून अर्जंट आला तो..

मृदुला : आजकाल फारच काम पडतेय मिलिंदकडे.. बात क्या है?

मुकुंद : हो ना.. काय करणार..

मृदुला : अरे मुकुंद, तुला त्या दिवशी पाहिले त्या भागात.. अरे चैतू पण तिकडेच राहतो. आय हॅड बीन टू सी हिम.. रात्रीची वेळ होती. तू बाईकवर फिरत होतास ..

मुकुंद : हां.. असणार. बँकेच्या कामासाठी आलो होतो..

मृदुला : असणार .. बँक म्हणजे कामं पण फार असणार .. मग आज काय स्ट्रॅटेजिक मीटिंग दिसतेय ..

मिलिंद : हो ना.. चहात एका ऐवजी दोन चमचे साखर टाकायचे प्लॅनिंग करतोय हा..

मृदुला : अरे वा! इतक्या लवकर तोंड गोड! तशी तुझी शीतलही गोडच आहे मुकुंदा..

मुकुंद : छान.. दोघे मिळून माझीच खेचताय.. अर्थात शीतलबद्दल तू म्हणालीस ते खोटे नाही..

मिलिंद : मला वाटलं उखाणा घेशील एखादा .. भाजीत भाजी चवळीची नाहीतर पडवळाची.. शीतल ह्याच्या प्रीतीची..

मुकुंद : वा! उखाणा पाठ आहे हा एकदम.. बरोबर आहे कधी वापरावा लागेल तुला नेम नाही.. हो की नाही मृदुला?

मृदुला : खरंय. मिलिंदला काय.. ही इज सो पॉप्युलर .. अमंग्स्ट गर्ल्स ..पण हा नुसता कोणाला विचारेल तर.. (घड्याळाकडे पाहात) ओह.. गेटिंग लेट.. चल मी निघते.. माझा क्लास आहे..

मिलिंद : यावेळी?

मृदुला : योगासनांचा .. आय विल मेक अ मूव्ह .. बाय..

(मृदुला जाते.)

मुकुंद : आय थिंक यू ऑल्सो मेक अ मूव्ह! मला वाटते शी हॅज गिव्हन द हिंट.. नुसते प्रपोज.. आणि आय थिंक ती लाजली .. नाव घेण्यावरून.

मिलिंद : कायतरीच. ती तशीच आहे.. हां आय शूड मेक अ मूव्ह .. तर तू माझा घोडा.. नो.. घोडा उगाच वाकड्यात शिरतो. तू माझे प्यादे .. दोन घरे पुढे जा आणि शोधून काढ.. व्हॉट प्लीझेस हर!

मुकुंद : हो.. आता तेवढेच काम बाकी आहे.. सो आय विल मेक अ मूव्ह.. बेगम आयॅम कमिंग.. बाय.. हे तुला बरे..

(मुकुंद निघून जातो.)

मिलिंद :

गणित सोपेय..

मॅथ्स इज माय फोर्टे..

कठीण गणिताचे सोपे उत्तर काढतो मी..

पण हे गणित?

हे सुटत नाही ..

सुटतच नाही?

की मी सोडवत नाही ठीक?

की मुळात ह्या गणितातच काही चूक आहे?

शी इज गुड..

पण शी इज गुड टू एव्हरीबडी!

देन हाऊ डू आय नो..

इफ शी कॅन बी माय बडी?

तशी ती आहे बडबडी!

आणि

मेरी बातेंही सिर्फ बडीबडी!

प्रवेश ४

(स्थान : टीचर्स रूम.

मिलिंद एकटाच आहे.)

मिलिंद :

वा! मुकुंदानी चांगलीच बातमी आणलीय. चैतू..भय्या थ्यँक्यू.

त्याने पुढे काही होणार नाही हे खरं पण कहाणीला मृत शेवट तर नाही येणार हे खरे! मृत शेवट म्हणजे डेड एंड!

तर गणित कमीत कमी अजून आहे तरी सोडवायचे! नाहीतर उद्या परीक्षेला बसायलाच क्वालिफाय नसतो झालो तर! त्यापेक्षा हे बरे!

पंचाहत्तर टक्के अटेंडन्स कम्पलसरी असतो म्हणे युनिव्हर्सिटीत!

मी शंभर टक्के क्वालिफाय झालोय.. आता काही मार्ग निघेल.

मुकुंद घेऊन येईल आतील गोटातली खास बातमी. थोडक्यात त्यानंतर हलवावे हात पाय..

आणि पोहत निघावे प्रेमसागरात..

समजा ऐंशी किमी ताशी वेगाने नौका निघाली तर अथांग प्रेमसागर तरून जाण्यास तिला किती वेळ लागेल? करा हिशेब! आहे की नाही सोपे गणित! पण आयॅम नोन फॉर कठीण गणित इन इझी वे! तेव्हा गणित कठीण असेल तरच सुटेल..

की सोपे गणित कठीण करून मगच सोडवेन मी? कुणास ठाऊक!

मृदु मृदुल मृदुला ..

तूच सांग तुझ्या पर्यंत पोहोचण्याचा सोपा आणि सुलभ मार्ग.

प्रिय य, तुला कधी कळेल माझ्या यक्ष प्रश्नातला विविक्षित क्ष मीच नि त्या क्ष ची तूच आहेस य?

की ही भाषा नकोच?

पण प्रेमात सारेच क्षम्य असेल तर बीजगणिती भाषा का क्षम्य नसावी?

पण आयॅम पॉझिटिव्ह नाऊ..

कालच पुस्तक आणलेय लायब्ररीतून.. इफेक्ट्स ऑफ पॉझिटिव्ह थिंकिंग.. वाचले नाही अजून .. पण वाचेन असा पॉझिटिव्ह विचार करायला काय हरकत आहे?

(मृदुला आत येते..)

मृदुला : मिलिंद.. तू इथे आहेस?

मिलिंद : अर्थात .. हे स्वप्न की सत्य? (चिमटा घेतो स्वतःला नि विव्हळत ..) आई गं.. (मृदुला कडे पाहात) तू? कधी आलीस?

मृदुला : तुला स्व चिमट्याचा छंद आहे का? आता सांगू नकोस की मच्छर चावला म्हणून!

मिलिंद : छे.. काहीतरी विचारात होतो.. तंद्री लागली ना माझी की असे होते..

मृदुला : आय नो.. मोठमोठे गणिती असेच असतात .. जगाचे प्रश्न गणिती पद्धतीने सोडवणारे! आणि त्यात तू तर काय! कठीण प्रश्नांचे सोपे उत्तर काढणारा. तू असा विचारात गढून जाणे स्वाभाविकच आहे!

मिलिंद : तू ना अशी आहेस.. पण प्रश्न सोडवण्याचा मी प्रयत्न करत होतो हे मात्र खरे!

मृदुला : आम्ही कि नाही सगळे काही इकॉनॉमिक्सच्या चष्म्यातून पाहतो.. सगळे काही मागणी आणि पुरवठ्यावर अवलंबून आमचे! कसली तरी मागणी असली की तिचा पुरवठा नि त्याचे अर्थशास्त्रीय परिणाम यावर आमचे तत्वचितंन! व्हॅल्यू नि वेल्थ आणि ॲसेट्स आणि कॅपिटल! रादर वुई कॅपिटलाझ ऑन दॅट.. त्यात गणिती संकल्पना पण असतात .. पण तुझ्या सारखे आम्ही काही गणिती नाही ..

मिलिंद : हुं.. आय नो! गणिती! आज लवकर आलो.. एक्स्ट्रा क्लास घ्यायचाय थर्ड इयरचा.. निघतोच मी.. एक्झाम्स जवळ आल्यात..

मृदुला : हो ना. पण बऱ्यापैकी पोर्शन संपवला मी.. सो आय ॲम बिट फ्री नाऊ..

मिलिंद : चांगलेय.. मी निघू..

मृदुला : मिलिंद..

मिलिंद : काय?

मृदुला : काही नाही ..

मिलिंद : काहीच नाही ..

मृदुला : नाही ..

मिलिंद : नक्की?

**प्रवेश ५**

(स्थळ तेच..)

मिलिंद : तू .. काही म्हणालीस?

मृदुला : छे.. कुठे काय?

मिलिंद : असे वाटले की काहीतरी म्हणतेस तू..

मृदुला : नाही रे.. भास झाला तुला ..

मिलिंद : असेल भास .. असेल आभास .. नाहीतर असतील नुसतेच तुझे श्वास.. श्वास नि उच्छ्वास .. त्यातून येणारा एकच रव ..

मृदुला : मी? मी काहीच नाही बोलले.. काय ऐकलेस तू.. तू ठरव..

मिलिंद : ऐक.. न बोलता वाटते तू बोलतेस काहीतरी ..

मृदुला : काहीतरीच?

मिलिंद : नव्हे .. च नव्हे .. काहीतरी! तुझ्या नाजूक ओठांची होते हालचाल.. त्या कोकिळ कंठातून ऐकू येतो गुंजारव..

मृदुला : गुंजारव? कोकिळेचा?

मिलिंद : होय सखे होय.. कोकिळकंठी गुंजारव.. न ऐकता ऐकू येतो मला..

मृदुला : छे! काहीतरीच! भुंगा कुठचा! आणि न ऐकता कधी कुणाला ऐकायला येते का?

मिलिंद : मग न बोलता बोलतेस कशी तू..

मृदुला : तो तुझाच भास गडे..

मिलिंद : न बघता ही बघता येते मन:चक्षूंनी.. मग न बोलता कळते डोळयांची भाषा.. प्रिये जे न देखे रवि.. ते सांगून जाई नेत्र पल्लवी..

मृदुला : वा! अशीच कविता हवी!

मिलिंद : नयनाचे मारीशी बाण.. प्रिये फक्त तुझ्यास्तव .. घेतो मी ही आण..

मृदुला : आण.. आण? काय आणू?

मिलिंद : आण प्रिये आण.. माझ्या प्रीतीची आण.. पण नकोस रूतवू नि:शब्दांचे लाडिक बाण.. करतील ते मला घायाळ..

मृदुला : गंमत सांगू.. तू वनराज .. सांभाळ तुझी आयाळ!

मिलिंद : काय गंमत ना.. एका जंगलात तू आणि मी.. मी वनराज .. तू सिंहीण.. मिळून करू शिकार.. मी हरीण मारेन .. तू बनव त्याचे मस्त कटलेट्स.. डिअर मसाला फ्राईड मीट.. आपली पिलं येतील मग लुटूलुटू चाटायला ..

मृदुला : अय्या.. असा कुणी केला असेल का..  प्रेमसंवाद? यू आर अ फनी गाय..

मिलिंद : मी गाय? नाही काही .. बैल..

**प्रवेश ६**

(स्थान : कॉलेज कट्टा.)

मिलिंद : आलास.. ये. काय आणलीस बातमी बाबा. जरा बऱ्या बातम्या आणत जा रे.. तशी मागच्या वेळची बरीच होती .. बरी नाही छानच होती.. आता या वेळी काय.. चांगल्या आणशील तर पुढचे काम मिळेल. नाहीतर बसा घरी.. एज्युकेटेड अनेम्प्लाॅईड!

मुकुंद : बस.. किती बोलशील? अरे ये बंदा जो हात में काम लेता है वो तडीस नेता है! म्हणजे एवढेच की फर्दर डिटेल्स आर रेडी .. पण त्याचा तुला काय फायदा होईल किंवा तू काय करून घेशील याची हमी घेण्यास सदर बंदा बांधील नाही!

मिलिंद : म्हणजे?

मुकुंद : म्हणजे? अरे हमने सब माहिती काढी. खोद खोदके काढी. पण तू त्या माहितीचे काय करशील कुणास ठाऊक! चैतन्य भाऊंची माहिती देऊन पंधरावीस दिवस झाले.. काय झाले पुढे? पाहिली असणार काही स्वप्नं.. दिवसा नि रात्री! पण प्रत्यक्ष मैदानात? प्रगती शून्य! अरे शून्याचा शोध लावणे पण सोपे असेल यापेक्षा. गणिती ना तू? कर हिशेब आणि सोडव गणित!

मिलिंद : काय आहे.. दगडाखाली हात अडकला तर ऐकून घ्यावे लागते.. तुझ्या नि शीतलच्या स्टोरीतले डिटेल्स मला ठाऊक नाहीत असे समजू नकोस .. बस यूं तो हमें बोलने की

आदत नहीं है समज.. स्केलेटन्स विल टंबल फ्रा ॅम द कपबोर्ड.. पण जाऊ देत.. सांगून टाक.. मी कानात प्राण आणून ऐकतो.. मृदू सबाह्य नवनीत .. कैसे माझ्या मृदुलेचे चित्त.. बोल!

मुकुंद : वा! कविराज वा! तिला कवितेची आवड आहे..

मिलिंद : ती मला जमत नाही. रेडिमेड कविता करून देत असेल कुणी तर सांग.. देईन ऑर्डर..

मुकुंद : तिला योगासनांचे वेड आहे..

मिलिंद : शवासनाव्यतिरिक्त काही जमत नाही मला.. आणि माझ्याच तंगड्या माझ्याच गळयात अडकवल्याने ती कशी काय इंप्रेस होईल .. झालीच तर मला दिसेल का.. कारण माझी मुंडी असेल खाली.. धुंडीत पाताळ..

मुकुंद : ती स्वयंपाक चांगला करते..

मिलिंद : हे चालेल .. मी करून आणतो अळूचं फदफदं आणि चिकन चाव चाव.. आणि घालतो घाव.. आवडतो ना तिला पाव?

मुकुंद : ते नाही ठाऊक.. पण अशा कवितेपासून दहा हात दूर पळेल ती.. तेव्हा कविराज बाबूजी जरा संभलकर.. तर तशी ती सकाळी जाते जॉगिंगला..

मिलिंद : ते मी करू शकतो.. पण मुद्दाम उठून तिच्या इकडे जॉगिंगला जायचे.. ओके इफ शी वा ॅज स्टेईंग नियर बाय..

मुकुंद : तिला वाचनाची आवड आहे..

मिलिंद : त्याची चिंताच नको.. दर दोन दिवसांनी मी लायब्ररीतून नवीन पुस्तक इश्यू करतो.. वाचत नाही ही वेगळी गोष्ट.. पण तिने कित्येकदा पाहिलेय ते .. हे ऑलरेडी झालंय..

मुकुंद : आणि तिला विनोदी सिनेमे आवडतात.. चार्ली चॅप्लिन.. मिस्टर बीन.. वगैरे

मिलिंद : युजलेस पीस ऑफ इन्फर्मेशन! तिला डायरेक्ट घेऊन जाऊ सिनेमाला?

मुकुंद : आणि जेव्हा जाशील तेव्हा सिनेमा थोडीच पाहशील ..

मिलिंद : दॅट आय डोन्ट नो.. तुझा एक्स्पिरियन्स बोलतोय हे खरे! पुढे?

मुकुंद : ती कॉलेजात रनिंग चँपियन होती..

मिलिंद : आता मी.. रनिंग बिहाईंड हर..

मुकुंद : तिला खरे बोलणारी माणसं आवडतात..

मिलिंद : ठीक.. गीतेवर हात ठेऊन.. जो कहूंगा सच कहूंगा.. सच के सिवा कुछ नहीं कहूंगा..

मुकुंद : चालेल.. अशी साक्ष देत जा तू..

मिलिंद : अजून काही?

मुकुंद : अरे मी काय तिच्या घरात आठ दिवस लपून पाहिलेय का.. अजून काही विचारतोस ते.. मिळाले तेवढे मुद्दे आणले..

मिलिंद : अरे, यातला शुअर शाॅट कुठलाच नाही फॉर्म्युला.. नाऊ व्हॉट? आणि मुद्दाम काही करावे यातले तर तिला संशय नाही येणार?

मुकुंद : कसला संशय? की यू आर ट्राइंग टू इंप्रेस हर? पण तुला तेच हवेय ना?

मिलिंद : तेच हवेय .. पण नॅचरली व्हायला हवे! मुद्दाम केले तर.. मी एक काम करतो.. तू सांगितलेले पॉईंट्स लिहून काढतो. पाठ करतो.. मग एकेका मुद्द्यावर मुद्देसूद विचार, चिंतन आणि मनन करून ठरवतो.. पुढील प्लॅन ऑफ ॲक्शन..

मुकुंद : बघ तू काय ते.. आता पुढचे काम तुझे तूच करायचे. आय हॅव डन माय जॉब..

मिलिंद : एक डाऊट आहे.. तू डिटेक्टिव्ह एजन्सी चालवतोस की काय? एवढी माहिती काढायला? हू गेव्ह द इन्फर्मेशन?

मुकुंद : ते विचारू नकोस .. तू फक्त आपले काम होतंय की नाही ते बघ.

मिलिंद : नाही .. तुझा साईड बिझिनेस .. वाढत्या संसारात मदत ..

मुकुंद : एवढी काळजी घेतल्याबद्दल धन्यवाद! मी निघतो.. संसारी लोकांच्या काळज्या नाही समजायच्या तुला बाबा .. हॅव टू रीच .. बिफोर शीतल बिकम्स गरम.. तिच्या रागास उकळी फुटण्याआधी पोहोचतो.. कठीण रे बाबा. मी निघतो. दिलेल्या माहितीचे सोने करा.. लवकरच होऊन जाऊ देत वाजवा रे वाजवा! तुझ्या डोक्यावर अक्षता पडलेल्या पाहिल्या की सुखाने डोळे मिटेन रे बाबा ..

मिलिंद : नका हो आजोबा असे बोलू .. तुम्ही आम्हाला हवे आहात.. तुमची पोरं आम्हाला मांडीवर खेळवायची आहेत.. चल जा आता.. थ्यांक्स फॉर इन्पुट्स.. आणि प्रॉमिस.. सगळे काही ठीक झाल्यावर मृदुलाच्या हातचे जेवायला बोलावीन एकदा.. गरमागरम.. अळूचे फदफदे..

मुकुंद : म्हणजे कधी .. कोणास ठाऊक.. चल बिफोर शीतल बिकम्स गरम.. बाय..

(मुकुंद निघून जातो.)

मिलिंद :

गणिताच्या फॉर्म्युलात घातली ही व्हेरियेबल्स की उत्तर यायला कितीसा लागणार वेळ

विचार कर करून झालीय झाले भाव भावनांची भेळ!

आय नो फॉर शुअर.. टू प्लस टू इज फोर..

अँड आय विल ट्राय टू द कोअर ..

करीन मी काही पॉईंट्स स्कोअर

पण कराव्या लागतील का अपेक्षा लोअर?

छे! याला काहीच नाही अर्थ

खरेतर अर्थाचा हा अनर्थ..

तिला आवडते म्हणून कविता असली करू?

जे नाही जमत, सोडून देतो.. जाऊ दे मरू..

पण अजून करू तर काय करू..

बसू शांत आणि विचार तर करू..

यस्स .. होईल काही ना काही आयॅम होपफुल

देईल हरी खाटल्यावरी का.. यू डॅम फूल?

हलव हातपाय, उठ आणि कर काहीतरी

नाहीतर काय.. बस मिस होईल ना बरी..

आय कान्ट लेट धिस हॅपन ..

प्रयत्न करेन मी छॅप्पन..

छॅप्पन? कविता इज अ डिफिकल्ट प्रपोझिशन.. गड्या आपुले गद्य बरे.. मृदुला .. काय करू की तुला कळेल माझ्या दिल की बात?

.. करतो विचार म्हणजे सुटेल हे कठीण गणित!

**प्रवेश ७**

(स्थळ : कॉलेज कट्टा

मुकुंद बसला आहे. मिलिंद घाईघाईत येतो..)

मिलिंद : एवढ्या घाईत बोलावलेस. अरे क्लास आहे माझा ..

मुकुंद : ठीक आहे जा तू. पण नंतर सांगू नकोस, मला जे ठाऊक आहे ते सांगितले नाही तुला म्हणून.

मिलिंद : बोल लवकर नि जाऊ दे..

मुकुंद : बोलतो..

मिलिंद : बोल..

मुकुंद : च्यायला, तू विचित्र झालायस आजकाल.. तुझ्या साठी आलो मुद्दाम नि माझ्यावरच चिडतोयस..

मिलिंद : सॉरी यार.. काय आहे ना एखादे गणित

सुटता सुटत नसेल तर माझी थोडी चिडचिड होते.. तशी झालीय.. सॉरी. क्षमस्व!

मुकुंद : ठीक. माफ किया .. जा.

मिलिंद : पण दॅट इम्पाॅर्टंट काम.. मला टेन्शन आहे रे जाम..

मुकुंद : ऐक. तुला खूप दिवसांपूर्वी मृदुलाची माहिती दिली मी.. डिटेल्स. आठवत असेलच..

मिलिंद : अर्थात. विसरायला तो काय एकोणतीसाचा पाढा आहे?

मुकुंद : पण आता महत्त्वाच्या माहितीचा एक तुकडा आला आहे हाती ..

मिलिंद : जस्ट बाय द वे.. तुला ही माहिती कुठून मिळते सांगशील का?

मुकुंद : तुला आम खाने से मतलब की पेड गिननेसे? आणि आता कुठे जातोय तुझा उशीर मुरकुटे सुता?

मिलिंद : ठीक.. बोल..

मुकुंद : तर, महत्त्वाची माहिती अशी .. की मृदुला इज गेटिंग एन्गेज्ड! म्हणजे अगदी आतल्या गोटातली माहिती आहे, पण कन्फर्मड आहे..

मिलिंद : बाप रे! आता?

मुकुंद : आणि शी इज लिव्हिंग फॉर हर गाव टुडे..

मिलिंद : इतकी शाॅर्ट नोटिस?

मुकुंद : नोटिस? तुला कुणी नोटिस का द्यावी? ती सगळी माहिती मी काढली. ती देऊन सुद्धा आता महिन्याहून जास्त काळ होत आला.. हलवलेत हातपाय काही? शाॅर्ट नोटिस म्हणे. तुला काय कोर्टातून ऑर्डर पाठवायला हवी होती? तिने .. फॉर युवर काइंड इन्फर्मेशन.. काइंडली नोट दॅट आय द अंडरसाइन्ड विल बी गेटिंग एन्गेज्ड .. प्लीज नोट म्हणून?

मिलिंद : आता पुढे काय?

मुकुंद : हे बघ.. एक उपाय आहे.. रादर एकच उपाय आहे

मिलिंद : बोल लवकर ..

मुकुंद : जस्ट प्रपोज हर..

मिलिंद : कधी?

मुकुंद : आज.. आता.. ताबडतोब .. म्हणजे बिफोर शी लिव्हस .. नाहीतर यू विल मिस द बस ऑफ मिस भडभडे..

मिलिंद : अरे पण.. इतक्या शाॅर्ट नोटिस.. सॉरी .. पण आयॅम अनप्रिपेयर्ड..

मुकुंद : ओके.. सो यु आरन्ट शुअर अबाऊट युवरसेल्फ.. अजून दुसरी कोणी?

मिलिंद : चूप.. मला दुसऱ्या कुणाची कल्पनाही करवत नाही रे..

मुकुंद : मग बघ.. प्रपोज ऑर पेरिश!

मिलिंद : ओके.. पण मी काहीच तयारी नाही केली.

मुकुंद : अरे तयारी कसली करतोयस? चार शब्द तर बोलायचे ..

मिलिंद : चार शब्द..?

मुकुंद : ते काय ते मी सांगणार..? नि एक लाल  गुलाबाचे फूल दे तिला..

मिलिंद : आता ते कुठून आणू?

मुकुंद : मला ठाऊक होते हे.. हे घे.. लाल गुलाबाचे फूल.. यू फूल..

मिलिंद : म्हणजे तू तयारीनेच आलायस..

मुकुंद : अनफॉरच्युनेटली ज्याने तयारीने यावे तो सोडून सगळे तयार आहेत.. टेक धिस फूल अँड डू द नीडफूल..

मिलिंद : यस्स .. थँक्य यार. नाऊ ऑर नेव्हरवाली परिस्थिती आहे..

(मृदुला येते ..)

मृदुला : ओह हाय गाईज ..

(मिलिंद गडबडीत गुलाब लपवतो.)

मृदुला : सो व्हॉट्सअप? सकाळ सकाळी स्ट्रॅटेजिक मिटिंग? मुकुंदाला मिलिंदच्या ॲडवाईजची फारच गरज लागते आजकाल असे दिसतेय! ऑल ओके मुकुंदा?

मुकुंद : हो ना.. पण घाईत आहे मी.. मी निघतो .. मिलिंद द फूल.. डू नीडफूल..

मिलिंद : अरे.. जातोस कुठे .. थांब की..

(मुकुंद जातो.)

मृदुला : हा काय म्हणत होता? आणि मिलिंद, क्लास नाही आज?

मिलिंद : मुकुंदा असलाच आहे.. युजलेस.. कामधाम नाही त्याला. आणि क्लास ना? नाही.. म्हणजे आहे.. पण नाही आहे..

मृदुला : ओके.. मी निघते. आणि जस्ट सांगतेय.. आता महिन्यानंतर भेटू. गावी चाललेय मी आज..

मिलिंद : अशी तातडीने?

मृदुला : नाही .. तातडीने कसली. कधीच बुकिंग करून ठेवलेय..

मिलिंद : अर्जंट काम बिम?

मृदुला : अर्जंट नाही .. पण कामच.. तुला ठाऊक आहे ना.. आपल्याकडे मुलगी मोठी झाली की तिचे आईवडिल काय करतात ..

मिलिंद : काय करतात?

मृदुला : काय करणार दुसरे? तिला परत शाळेत घालतात.. पाटी दप्तर आणि युनिफॉर्म घालून..

मिलिंद : सॉरी .. काय आहे मी जरा विचारात होतो..

मृदुला : मग काढ की चिमटा स्वतःला..

मिलिंद : सॉरी .. पण मृदुला मला तुला काही सांगायचेय..

मृदुला : सांग.. महिन्यात परत येतेच आहे ना मी.. मग ऐकते.

मिलिंद : महिना? नाही .. आता.. इथे..

मृदुला : सांग.. लवकर. मी वाट पाहतेय ..

मिलिंद (हळूच गुलाब काढतो पुढे. तिला देत..) : हे गुलाबाचे फूल.. तुझ्यासाठी..

मृदुला : काय आज अचानक?

मिलिंद : आय थिंक .. यू नो व्हॉट ..

मृदुला : व्हॉट?

मिलिंद : आय थिंक आय लव्ह यू मृदू .. मृदुला.

मृदुला : यू थिंक?

मिलिंद : नाही. आयॅम शुअर.. आय लव्ह यू डियर मृदुला ..

मृदुला (फूल घेत) : थ्यँक्यू.. अँड आय नो इट! म्हटले ना मी वाट बघतेय.. कधीपासून .. याच क्षणाची..

मिलिंद : म्हणजे? तुला ठाऊक होते..

मृदुला : अर्थात .. अरे बोका डोळे मिटून दूध पित मच्छर मारत असेल नि स्वतःला चिमटा काढत असेल.. त्याला वाटते कुणी बघत नाही ..

मिलिंद : मग तूच का नाही बोललीस?

मृदुला : मी? मीच का? अरे, आय वाँटेड धिस रेड रोज.. आणि मला माहिती होते.. तो मला मिळणार एक दिवस .. पण तू हे गणित सोडवायला खूपच दिवस घेतलेस..

मिलिंद : अर्थात .. गणित होतेच कठीण ..

मृदुला : कठीण? सोपे गणित कठीण करून सोडवतोस तू.. मॅथ्स प्रोफेसर म्हणे!

मिलिंद : सोपे?

मृदुला :अर्थात .. मी किती वेळा हिंट दिली पण तुला कळेल तर ना.. शेवटी माझा पेशन्स संपला.. मुकुंदच माझ्या मदतीला आला..

मिलिंद : मुकुंद?

मृदुला : अरे, ती लग्नाची पत्रिका देतानाच त्याने सगळे सांगून टाकले होते मला.. मी म्हटले बघू तू गणित कसे सोडवतोयस.. आय कान्ट रिलाय ऑन थर्ड पार्टी!

मिलिंद : दॅट्स अनफेअर. किती दिवस नि किती रात्री टेन्शन मध्ये गेल्या.. बिकॉज ऑफ दॅट स्टुपिड मुकुंद .. मग आज कधी निघतेस.. जायलाच हवे का? तेही एक महिना?

मृदुला : मी कुठे जाणारे? ॲम गोइंग नोव्हेअर..

मिलिंद : पण तू म्हणालीस ते..

मृदुला : ती मुकुंदाची आयडिया.. तुला खडबडून जागे करायचे तर..

मिलिंद : त्याला ना मी.. शिव्या द्यायला हव्यात त्याला.. सोडणार नाही ..

मृदुला : नो.. आय वोन्ट हिअर एनिथिंग अगेन्स्ट हिम.. त्याच्याच ह्या प्लॅनमुळेच तर तुझे गणित सुटलेय हे. तो म्हणालाच मला, तुला अगदी शाॅर्ट नोटिस दिली तरच तू सोडवशील हे सोपे गणित! किती कठीण करून. आणि माझा अंत पाहून. यू आर अ व्हॅल्यूएबल ॲसेट.. द वेल्थ.. पण तू एक मूर्ख आणि बावळट आहेस एक नंबरचा .. थोडा विचित्र ही.. थोडा स्क्रू ढिला आहे.. आणि तुला तशी अक्कल ही कमीच आहे. मॅथ्स प्रोफेसर म्हणे..

मिलिंद : दॅट्स अन लाइक यू मृदू.. तुला सगळयांतले चांगले गुण दिसतात ना?

मृदुला : यस्स ..पण इतरांतले.. बट नाऊ यू आर माईन .. तुला चांगले म्हणेन इतकी काही मी चांगली नाहीए राजा.. युजलेस.. यू गेव्ह मी टफ टाईम..

मिलिंद : पण सोडवलेच ना मी हे गणित ..

मृदुला : सुटले म्हण.. सोपे गणित कठीण पद्धतीने .. पण सुटले मात्र हे खरे..

मिलिंद : जाऊ देत.. या कठीण गणिताची ऐसी की तैसी..

मृदुला : एक.. ऐक. यू आर टू क्यूट डियर.. आणि तुला अजून एक सांगायचं राहिलं..

मिलिंद : काय?

मृदुला : आय डोन्ट लव्ह यू मच..

मिलिंद : आता?

मृदुला :  माय स्टुपिड मंकी .. आय लव्ह यू टू मच..

मिलिंद : मी टू..

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे चौविसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे हे ज्येष्ठ लेखक, आपली यशस्वी श्वसनरोगतज्ञ म्हणून लोकसेवा पार पाडत असतानाच कथा, नाटके, लघुनिबंधही लिहीतात. त्यांच्या खुसखुशीत विनोदी साहित्याचे व नाटकांचे चाहते आता जगभर पसरले आहेत. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत. पण डॉ. नितीनजी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), नासा येवतीकर(७), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२४ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१२), डॉ. नंदिनी धारगळकर(८) संयम बागायतकर(२), मीना खोंड(१) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।